# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## पुणे महानगर प्रदेश क्षेत्राच्या प्रारूप विकास योजनेचे प्रसिद्धीकरण, प्रारूप विकास आराखडा मध्ये त्रुटी आढळून येत असल्याबाबत

**(१) ३२६३९ (२७-१२-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर प्रदेश क्षेत्राच्या प्रारूप विकास योजनेचे प्रसिद्धीकरण, प्रारूप विकास आराखडामध्ये त्रुटी आढळून येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २ ऑगस्ट, २०२१ चा महाराष्ट्र शासन राजपत्र यातील पुणे महानगर प्रदेश क्षेत्राच्या प्रारूप विकास योजनेचे प्रसिद्धीकरण, प्रारूप विकास आराखडा मधील ग्रामीण क्षेत्राचे प्रसिद्ध केलेल्या खडकवासला (ता.हवले) गावांच्या नकाशांचे अवलोकन केले असता शेती, वन, वनीकरण, हिल टॉप हिल स्लोप, पर्यटन, ग्रीन बेल्ट वापर विभाग आणि रस्त्यांचे आरक्षण प्रस्तावित करतांना गावांचा भौगोलिक आणि गावठाण क्षेत्राचा विचार न करता शेतकऱ्यांवर अन्याय करणारे आरक्षणे दर्शविले असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गावांमध्ये प्रत्यक्षात गावठाण क्षेत्र मोठ्या प्रमाणावर असून गावांतील अंतर्गत रस्ते, पाणंद रस्ते, स्मशानभूमी, शेकडो वर्षापासूनची जुनी घरे, मंदिरे व तदनुषंगिक इमारती असतांना देखील आपल्या कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या नकाशांत गावठाण क्षेत्र दर्शविलेले नसून अनेक ठिकाणी निवासी क्षेत्रावर शेती झोन टाकलेला असून वास्तविक पाहता ज्या ठिकाणी रहिवासी क्षेत्र नाही परंतु व्यावसायिक स्वरूपाचे रेस्टॉरंट, रिसॉर्ट करिता सोयीचे आरक्षण दर्शविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर प्रारूप विकास योजनेस दि. २९.०७.२०२१ रोजी मान्यता दिली असून प्रारुप विकास योजना कलम २६ अन्वये दि.०२.०८.२०२१ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर प्रारुप विकास योजनेत प्रत्येक नागरी विकास केंद्रासाठी उपलब्ध साधन सामुग्री, संसाधनाचा विचार करुन आर्थिक वृद्धीसाठी विशिष्ट संकल्पना निश्चित करण्यात आली आहे व त्यानुसार नियोजन आराखड्यामध्ये पुरक उपाययोजना निश्चित करण्यात आल्या आहेत.

(२) अशी बाब नाही. पुणे महानगर प्रदेशाच्या प्रसिध्द केलेल्या प्रारूप विकास आराखड्यात १८ नागरी विकास केंद्र प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. त्यापैकी खडकवासला नागरी विकास केंद्रामध्ये मी खडकवासला, ता. हवेली या गावाचा समावेश आहे. सदर खडकवासला नागरी केंद्राची संभाव्य लोकसंख्या अस्तित्वातील भूवापर नकाशे व भौगोलिक रचना विचारात घेवून विविध वापर विभाग, विकास योजना रस्ते व विविध सार्वजनिक वापरासाठी आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

(३) अशी बाब नाही. प्रारूप विकास योजना तयार करण्याकरिता भूमी अभिलेख विभागाकडून साक्षांकित गाव नकाशे प्राप्त असून त्याचा वापर करुन प्रारूप विकास योजना तयार करण्यात आलेली आहे. सदर खडकवासला गावाचे गावठाण हे प्रारूप विकास आराखड्यामध्ये रहिवास वापर विभागात समाविष्ट असून दाटीवाटीचे क्षेत्र Congested मध्ये समाविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

प्रसिध्द केलेला सदर आराखडा प्रारूप आराखडा आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २५(२) च्या तरतुदीनुसार, प्रसिध्द प्रारूप विकास योजनेवर विहित मुदतीत नागरिकांकडून प्राप्त झालेल्या सूचना/ हरकतदारांना सुनावणी देवून नियोजन प्राधिकरणास अहवाल सादर करणेसाठी नियोजन समिती गठित करणेत येत आहे. नगर आणि प्रदेश रचना/पर्यावरण या क्षेत्रातील ४ तज्ञ व्यक्तिंची नियुक्ती करण्यात आली असून ३ अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येत आहे. सदर समिती विहीत मुदतीत प्राप्त सर्व हरकती / सूचना ह्यांचेवर सुनावणी घेऊन त्याबाबतचा अहवाल प्राधिकरणास सादर करतील. त्यानुसार प्राधिकरण व पुणे महानगर नियोजन समिती, प्रारुप विकास योजनेत आवश्यक ते फेरबदल प्रस्तावित करून तो शासनास अंतिम मंजूरीसाठी सादर करेल व त्यानंतर शासनाकडून त्यास अंतिम मंजूरी देण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर महानगर पालिका क्षेत्रात सिवरेज लाईन प्रकल्पातील भूमिगत नालीचा विस्तार व दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करण्याबाबत

**(२) ४५४९९ (२३-०९-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिका क्षेत्रात सन २०२१-२२ या वर्षातील अर्थसंकल्पात सिवरेज लाईन प्रकल्पासाठी शहरातील उत्तर, मध्य, दक्षिण सिवरेज झोन अंतर्गत भूमिगत नालीचा विस्तार व दुरुस्तीसाठी ३७ कोटी रुपयांचा निधीची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत सदर सिवरेज लाईनचे ६०% काम अपूर्ण राहिल्याने नागरिकांच्या घरामध्ये दुषित व मल:निस्सारण वाहिन्याचे पाणी शिरल्याने रोगराईचे प्रमाण वाढले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार उक्त क्षेत्रातील अपूर्ण असलेले काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे तसेच पूर्ण केलेल्या कामाचा तपशील काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-११-२०२३) :** (१) मनपा सभागृहा मार्फत ठराव क्र. २०/वि.क्र.१०० दिनांक २०.०१.२०२१ अन्वये नागपूर शहरात नॉर्थ, सेंट्रल व साऊथ सिवरेज झोन अंतर्गत सिवर लाइन व चेंबर्सची देखभाल व दुरुस्तीकरिता एकूण रु.३१,३०,२९,८६८ इतक्या किंमतीच्या कामास मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. यासाठी सन २०२१ ते २०२३ या आर्थिक वर्षाकरिता अनुक्रमे रु.१७ कोटी व रु.२५ कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) मनपा अर्थसंकल्पातील सन २०२१ व २०२२ चे उपलब्ध तरतुदीचे व कामाचे व्याप्तीचे अनुषंगाने कामाचा कालावधी १२ महिने ते १८ महिने होता. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे व अतिवृष्टीने सदरील कामे विहित मुदतीमध्ये पूर्ण करता आली नाही. सदरील संपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## ठाणे जिल्ह्यातील सीआरझेड व कांदळवन भागात इमारत दुरूस्तीसाठी परवानगीच्या नावाखाली अनाधिकृत बांधकामांना संरक्षण दिल्याबाबत

**(३) ५४९१६ (२७-०१-२०२३). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सीआरझेड व कांदळवन भागात इमारत दुरूस्तीसाठी परवानगी देताना अनधिकृत बांधकामांना संरक्षण दिले जात असून अनधिकृत टोलेजंग इमारतीचे बांधकाम सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बांधकामांना आयुक्तांनी मंजुरी दिली असल्याची बाब दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदा बांधकामांना मंजुरी देणाऱ्या आयुक्तांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-११-२०२३) :** (१) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सीआरझेड व कांदळवन भागात अनधिकृत बांधकामास संरक्षण देणेकरीता परवानगी देण्यात आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथील भांडेवाडी डम्पिंग यार्ड इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत

**(४) ५६९५१ (२४-०४-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.टेकचंद सावरकर (कामठी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील भांडेवाडी डम्पिंग यार्डमध्ये मागील चार वर्षापासून कचऱ्यावर प्रक्रिया करणे बंद असल्याने तब्बल १६ लाख मेट्रिक टन कचरा प्रक्रियेविना तसाच पडून असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे भांडेवाडी परिसरातील जनतेला दुर्गंधीचा व आरोग्याचा सतत सामना करावा लागत असल्याने येथील जनतेने आंदोलने करून हे डम्पिंग यार्ड हटवण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भांडेवाडी यार्डातील कचऱ्यावर तात्काळ प्रक्रिया करून जनतेला होणाऱ्या आरोग्याच्या व इतर समस्या दूर करण्यासाठी व हे यार्ड इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-११-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.

नागपूर शहरात सद्यस्थितीत अंदाजे १०००-१२०० मे.टन प्रति दिन कचरा संकलित केला जात आहे. त्यापैकी भांडेवाडी येथे मनपाचे १५०-२०० मे.टन प्रति दिन ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती प्रक्रिया केंद्र अस्तित्वात असून ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येते. तसेच मनपाचे सुखा कचरा विलगीकरण केंद्र क्षमता ४०० मे.टन प्रतिदिन अस्तित्वात असून सुख्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन रिसायकलेबल मटेरीयल वेगळे करुन पुर्नवापराकरीता देण्यात येते. ओला व सुखा कचऱ्याच्या प्रक्रियेतून उर्वरीत इनर्ट मटेरीअल भांडेवाडी येथील लँडफिल मध्ये टाकण्यात

येते. याव्यतिरिक्त उर्वरीत दैनंदिन भांडेवाडी येथे येणारा कचरा लँडफिल वर जमा करण्यात येवून त्याच्या विंन्ड्रोज तयार करण्यात येवून त्यावर बायोकल्चरची फवारणी करण्यात येते.

लँडफिल मधील जूना जमा कचऱ्यापैकी ६ लक्ष मे.टन कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावण्याचे काम नागपूर स्मार्ट सिटीद्वारे मे.झिग्मा इनवायरो ग्लोबल सोल्युशन प्र.लि. यांना देण्यात आलेले असून आजपावेतो ४.२० लक्ष मे.टन कचऱ्यावर बायोमायनिंग करण्यात आलेले असून उर्वरीत काम जानेवारी, २०२४ पर्यत पूर्णत्वास येईल. तसेच स्वच्छ भारत मिशन-२.० अंतर्गत नागपूर महानगरपालिकेस रु.४२.०० कोटीच्या जून्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रकल्पास मंजूरी प्राप्त असून भांडेवाडी येथील लँडफिल मधील जूना उर्वरीत जमा कचरा १५.३० लक्ष मे.टन कचऱ्यावर बायोमायनिंग करुन त्याची योग्यरीत्या विल्हेवाट लावण्याकरीता नागपूर महानगरपालिकेद्वारा निविदा प्रक्रिया सुरू आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नागपूर महानगरपालिकेतर्फे स्वच्छ भारत मिशन २.० अंतर्गत लँडफिल मधील जूना जमा कचरा १५.३० लक्ष मे.टन कचऱ्यावर बायोमायनिंग करुन त्याची योग्यरित्या विल्हेवाट लावण्याकरीता निविदा प्रक्रिया सुरू आहे. येत्या तीन वर्षात हे काम पूर्ण करुन अंदाजे २७ एकर जागा मोकळी करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.

तसेच नागपूर शहरातून दररोज निर्माण होणाऱ्या १०००-१२०० मे.टन घनकचऱ्यावर एकीकृतरित्या भांडेवाडी येथे प्रक्रिया करुन त्याची योग्यरित्या विल्हेवाट लावण्याकरीता नागपूर महानगरपालिकेद्वारे निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून हे काम M/s. SusBDe LOC Nagpur Pvt. Ltd. या कंपनीला देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने एस.टी महामंडळाच्या दोन कंत्राटदारांनी जाहिरातीमध्ये केलेल्या गैरव्यवहारमुळे माहिती व जनसंपर्क यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत**

**(५) ५७३०१ (२८-०४-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने एस.टी.महामंडळाच्या दोन कंत्राटदारांनी जाहिरातीमध्ये केलेल्या गैरप्रकरणी तसेच शासनाच्या परवानगीशिवाय बेसिल कंपनीच्या नियुक्ती संदर्भात तत्कालीन संचालक श्री.अजय आंबेकर यांची विभागीय चौकशी करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.अजय आंबेकर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ नूसार महासंचालनायामार्फत स्वेच्छासेवानिवृत्तीची सूचना दिल्यानूसार त्यांना अनुक्रमे दिनांक ३१ मार्च, २०२१ व दिनांक १६ एप्रिल, २०२१ तसेच दिनांक २ ऑगस्ट, २०२१ च्या अधिसूचनेनुसार स्वेच्छानिवृत्ती देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चोकशीत काय आढळून आले ,मा. उपलोक आयुक्त यांनी संबंधित दोन कंत्राटदार यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या सूचना दिल्या असून या प्रकरणाच्या घोटाळयाची व्याप्ती विचारात घेता तत्कालीन संचालक यांचेवरही फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.

एस.टी.महामंडळाच्या दोन कंत्राटदारानी जाहिरातीमध्ये केलेल्या गैरप्रकरणी सामाजिक न्याय विभागातून कार्यवाही सुरू आहे.

वि.स. २१९ (5)

मे.बेसिल ही संस्था केंद्रशासनाच्या माहिती व नभोवाणी मंत्रालयाअंतर्गत कार्यरत मिनीरत्न संस्था आहे. सदर संस्था केंद्र शासन व अनेक राज्याच्या विविध मिडीया मॉनिटरींगचे (Third party Monitoring and Evalution) चे कामकाज करते.

सदर संस्थेच्या नियुक्ती संदर्भात संबंधितांविरुद्ध चौकशी प्रस्तावित आहे.

(२) हे खरे आहे

(३) या प्रकरणी मा. उपलोक आयुक्त यांनी दि.२०.०६.२०२३ रोजी अंतिम सुनावणी घेऊन काही शिफारशीसह प्रकरण बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील कोपरखैराणे येथील महापालिकेच्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) शाळेतील शिक्षक भरती व जाहीर केलेल्या नवीन शाळांबाबत**

**(६) ५७३३२ (२४-०४-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरखैरणे येथील नवी मुंबई महानगरपालिकेच्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) शाळेत शिक्षकच नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे तर दुसरीकडे नव्याने घोषणा केलेल्या दोन शाळा चालविण्यासाठी संस्थांच मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाच वर्षांपूर्वी महानगरपालिकेने सीवूडस व कोपरखैराणे येथे दोन शाळा सुरु केल्या असता या शाळांना प्रतिसाद वाढल्याने यावर्षी पुन्हा आणखी दोन शाळांची घोषणा करुन त्यानुसार वाशी व कोपरखैराणे सेक्टर-२ येथे या दोन शाळांचे नियोजन करुन प्रवेश प्रक्रियाही राबवण्यास सुरु करण्यांत आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शाळा चालविण्यासाठी कोणतीही खासगी संस्था पुढे येत नसल्याने यासाठी पालिका प्रशासनाने त्याकरिता निविदा प्रक्रिया राबविली मात्र त्यास प्रतिसाद न मिळाल्यामुळे महानगरपालिका आयुक्तांनी याच शैक्षणिक वर्षापासून शाळा सुरु होतील असे जाहीर करुनही यावर्षी माहे जूनमध्ये या शाळा सुरु होऊ शकल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोपरखैराणे येथील महापालिकेच्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) शाळेत शिक्षक भरतीबाबत व जाहीर केलेल्या नवीन शाळांबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-११-२०२३) :** (१), (२), (३) व (४) बाह्य संस्थेद्वारे शिक्षक उपलब्ध करून घेणेकरीता दि.१२.०७.२०२२ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यास एकही निविदा प्राप्त न झाल्याने दि.०५.०८.२०२२ निवेदेत EOI मध्ये सुट देऊन दि.१४.११.२०२२ व दि.०९.१२.२०२२ असे दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली होती.

यामध्ये एकच निविदा प्राप्त झाली असून कार्यालयीन प्रणालीत आहे. मात्र निविदा प्रक्रियेमध्ये विलंब होत असल्याने नवी मुंबई महानगरपालिकेने शाळा क्र. ९४ येथे तातडीने शिक्षक उपलब्ध होणेकरीता मे. एज्यकॅन्टीम डॉट इन्क या कंपनीस दि.०१.०७.२०२३ पासून तीन महिन्यासाठी एकूण ३७ शिक्षक उपलब्ध करून देण्यासाठी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

त्यानुसार सद्यस्थितीत शाळेवर पुरेसे शिक्षक उपलब्ध असून शालेय कामकाज सुरळीतपणे सुरू आहे.

वाशी व कोपरखैराणे या दोन सी.बी.एस.ई. नवीन शाळांसाठी संस्था नियुक्त करणेसाठी निविदा प्रक्रिया दि.२६.०५.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. प्रथमत: या निविदेस प्रतिसाद प्राप्त झाला नाही, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, या दोन शाळांमध्ये संस्था नियुक्त करणेसाठी फेनिविदा प्रस्तावित आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने दि.०७.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये शाळांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला असता, त्यास दि.१४.०९.२०२३ रोजी मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर शाळांना यानंतर आवश्यक असलेल्या मान्यता व शाळा सांकेतांक मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव कार्यप्रणालीत आहे.

यास्तव, माहे जून मध्ये शाळा सुरू होवू शकल्या नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर जिल्ह्यातील आरक्षित केलेल्या जागेवरील निवासी वसाहत असलेल्या भूखंडावरील आरक्षण रद्द करण्याबाबत.**

**(७) ५७६६९ (२४-०४-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात वेगवेगळ्या प्रयोजनाकरिता नागपूर सुधार प्रन्यास यांच्यामार्फत अंदाजे ३,८५,५७४ स्के.मीटर जागा आरक्षित करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील अनेक जागा या मागील ३० ते ३५ वर्षापासून आरक्षित केलेली असून या जागेत ६० टक्केपेक्षा जास्त नागरिकांनी घरे बांधलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरक्षित असलेल्या जागेवर बांधकाम केलेल्या भूखंडधारकांना आरक्षणातून सूट देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-११-२०२३) :**(१) होय, हे अंशतः खरे आहे.

नागपूर सुधार प्रन्यासला एकूण ६५०८.३६ हेक्टर जागेवरील सात योजनेकरिता नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केले असून उर्वरित योजनेकरिता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे. मंजूर विकास योजनेत ३४१९ हेक्टर जागेवर विविध आरक्षणे जसे की खेळाचे मैदान, उद्यान, प्राथमिक व माध्यमिक शाळा, दवाखाना व बाजार पेठ इत्यादी आरक्षणे दर्शविण्यात आली आहेत.

(२) व (३) होय, हे अंशतः खरे आहे.

सन २०१५ पूर्वीपर्यंतचे आरक्षण रद्द करण्याबाबत गठीत समितीने दिलेल्या अभिप्रायानुसार महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम, २००१ चा कलम ५ (१) अन्वये गुंठेवारी क्षेत्रामध्ये काही जागेवरील आरक्षणे रद्द करण्यात आली आहे. तथापि मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल जनहित याचिकेच्या अनुषंगाने आरक्षण रद्द करण्यास स्थगिती देण्यात आली असल्याने उर्वरित जागेवरील आरक्षण रद्द करता आले नाही. या जागांवर काही प्रमाणात बांधकाम करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिकमार्फत अमृत-२ योजनेंतर्गत मलनि:सारण व्यवस्था प्रकल्पांना तातडीने मंजुरी देण्याबाबत**

**(८) ५८९९८ (२१-०४-२०२३). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील नाशिकरोड, पंचवटी व जेलरोड विभागात मोठ्या प्रमाणात नवीन नागरीकरणामुळे व वाढत्या लोकसंख्येमुळे प्रचंड प्रमाणात निर्माण होणाऱ्या सांडपाणी व मलनिर्मितीमुळे कार्यन्वित असलेल्या सांडपाणी व मलनि:सारण प्रक्रिया केंद्र व मलनि:सारण व्यवस्था प्रकल्पावर प्रचंड ताण येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक रोड, पंचवटी व जेलरोड विभागातील नवीन विकसित होणाऱ्या भागात मलनि:सारण व्यवस्थेअंतर्गत नवीन मलवाहिका टाकणे तसेच जुन्या मलवाहिकेमध्ये सुधारणा करण्यासाठी रु.३०० कोटी तसेच तपोवन नाशिक येथे मलजल प्रक्रिया केंद्राची क्षमता वाढविण्यासाठी रु.१४५ कोटी व पंचक, नाशिक येथील मलजल प्रक्रिया केंद्राची क्षमता वाढविण्यासाठी रु.१४० कोटी असे एकूण ५८५ कोटी रुपयांचे मलनि:सारण व्यवस्था प्रकल्प प्रस्ताव नाशिक महानगरपालिकेच्या वतीने नगरविकास विभागाला माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील मलनि:सारण व्यवस्था प्रकल्प अमृत-२ योजनेंतर्गत मंजुरी अभावी नगरविकास विभागाकडे अद्याप पर्यंत प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडे प्रलंबित असलेल्या अमृत-२ योजनेंतर्गत मलनि:सारण व्यवस्था प्रकल्पांना तातडीने मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

नाशिक महानगरपालिका हद्दीतील नवीन नागरीकरणामुळे नवीन विकसित होणाऱ्या भागामध्ये मलवाहिन्यांचे जाळे विकसित करण्याकरिता महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात तरतूद करून कामे करण्यात येत आहेत.
(२) (३) व (४) (५) नाशिक महानगरपालिकेमार्फत केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील तपोवन व आगरटाकळी या दोन मलप्रक्रिया केंद्राचे नवीन मापदंडानुसार सुधारणा व उन्नतीकरण करण्याच्या प्रकल्पांची माहिती अमृत २.० अभियानाच्या पोर्टलवर सादर करण्यात आली होती. त्यास अनुसरून सदर प्रकल्पांना केंद्र शासनाच्या शिखर समितीने मंजुरी प्रदान केलेली आहे.

सद्यस्थितीस नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील तपोवन व आगरटाकळी या दोन मलप्रक्रिया केंद्राचे नवीन मापदंडानुसार सुधारणा व उन्नतीकरण करण्याच्या अनुक्रमे रुपये १३०.५२ कोटी व १०७.१९ कोटी किंमतीच्या मलनिःसारण प्रकल्पांची केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीने शिफारस केली असून याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

---

## अमरावती जिल्ह्यातील अमृत २.० अंतर्गत अमरावती शहर वाढीव पाणीपुरवठा करिता शिंबोरा नेरपिंगळाई टाकी तपोवन जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत लोखंडे जलवाहिनी उभारणीच्या कामाबाबत

**(९) ५९०२१ (२४-०४-२०२३). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील अमृत २.० अंतर्गत अमरावती शहर वाढीव पाणीपुरवठा करिता शिंबोरा नेरपिंगळाई टाकी तपोवन जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत लोखंडे जलवाहिनी उभारणे व इतर अनुषंगिक कामे करणे या बाबतचा अंदाजे ८२५ कोटी रुपयांचा प्रस्ताव महानगरपालिका आयुक्त, अमरावती यांनी त्यांचे पत्र क्रमांक ७६४/२०२३ दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी नगरविकास विभागास पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त कामासंदर्भात अंदाजे अडीच कोटी रुपयांचा निधी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अमरावती जिल्हा यांनाही पत्र देऊन त्याची प्रत माननीय मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत अमरावती शहराचा रुपये ९८५.४९ कोटी किंमतीचा पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव अमृत २.० अभियानाच्या पोर्टलवर अमरावती महानगरपालिकेने सादर केला असून सदर प्रकल्पाची या अभियानांतर्गत गठीत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीने केंद्र शासनाच्या शिखर समितीकडे शिफारस केलेली असून केंद्र शासनाच्या अंतिम मान्यतेनंतर सदर प्रकल्पाच्या मान्यतेच्या अनुषंगाने राज्यस्तरावरील पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## राज्यातील अनुसुचित जमातीच्या कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र वादग्रस्त पडताळणी समितीने अवैध व जप्त केले असल्याबाबत

**(१०) ५९६५४ (०३-०५-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसुचित जमातीच्या कर्मचाऱ्यांचे असलेले जात प्रमाणपत्र वादग्रस्त पडताळणी समितीने अवैध व जप्त केले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र.८९३८/२०१५ FCI विरुध्द जगदीश बहेरा व इतर दिनांक ६ जुलै, २०१७ च्या निकालाची अंमलबजावणी चुकीने पुर्वलक्षी प्रभावाने लागू करून दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजीचा शासन निर्णय काढून १२५०० कर्मचाऱ्यांना ११ महिन्यांकरीता अधिसंख्य पदावर वर्ग केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्मचारी मागील ३१ महिन्यापासून सेवा निवृत्त झाले असून या कर्मचाऱ्यांना पेन्शन व इतर लाभ देण्यात आलेले नाहीत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वार्षिक वेतनवाढ, महागाई भत्ता व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन, ग्रॅज्युइटी व इतर लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

राज्यात अनुसूचित जमाती प्रवर्गातील व्यक्तींना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देणे व अशा प्रमाणपत्राची पडताळणी करणे या बाबींचे विनियमन करण्याकरिता "महाराष्ट्र अनुसूचित जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० लागू केले आहे व त्यानुषंगाने महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ लागू केले आहे. सदर अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते.

(२) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिविल अपिल क्र. ८९२८/२०१५ (चेअरमन अँड मॅनेजिंग डायरेक्टर एफसीआय आणि इतर वि. जगदिश बालाराम बहिरा व इतर याचिका यामध्ये) दि. ०६.०७.२०१७ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत नियुक्त झालेल्या व जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना नियमित पदावरून कमी करून त्यांना मानवतावादी दृष्टीकोनातून तसेच प्रशासनाची अडचण होऊ नये यासाठी त्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्या आहेत.

सर्व प्रशासकीय विभागांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार आतापर्यंत ६८६० कर्मचाऱ्यांना अधिसंख्य प्रदावर वर्ग करण्यात आले आहे.

(३) व (४) सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १४.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळता इतर सर्व सेवाविषयक व सेवानिवृत्ती विषयक लाभ अनुज्ञेय करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील प्राचीन रंकाळा तलाव सवंर्धनाच्या नवीन प्रस्तावास मंजुरी देणेबाबत**

**(११) ६०७२४ (११-०५-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील प्राचीन ऐतिहासिक रंकाळा तलाव संवर्धनासाठी सुमारे १३ कोटी रुपयाचा प्रस्ताव महानगरपालिका प्रशासनाने अमृत योजना २ मध्ये समावेश होण्यासाठी शासनाकडे मान्यतेसाठी तसेच महाराष्ट्र जिवन प्राधीकरण विभागाकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर केला असल्याचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पाठविला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त नवीन प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त कोल्हापूर शहरातील प्राचीन रंकाळा तलाव संवर्धनाचा नवीन प्रस्ताव सन २०२१ मध्ये शासनाकडे सादर करण्यात आला असून सदर प्राचीन तलावाचे मुळ स्वरुप व इतर परिसराला कोणताही धक्का न लावता अद्ययावत पद्धतीने रंकाळा संवर्धन करण्यात यावे असा नवीन प्रस्ताव शासनास सादर केला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१), (२), (३) ४) व (५) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत कोल्हापूर महानगरपालिकेने रंकाळा तलाव संवर्धन प्रकल्प अमृत २.० अभियानाच्या पोर्टलवर शासनास सादर केला आहे. सदर प्रकल्पास केंद्रीय शिखर समितीने मान्यता दिलेली आहे.

कोल्हापूर महानगरपालिकेने तयार केलेल्या रंकाळा तलाव संवर्धन प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने रुपये ११.९९ कोटी किंमतीस तांत्रिक मान्यता प्रदान केली असून सदर प्रकल्पाच्या प्रस्तावास केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीने मान्यता देण्याची शिफारस केली असून त्यानुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

---

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील सेवकांच्या अडवणुकीमुळे मनमाड-नांदगाव (जि.नाशिक) मार्गावरील विद्यार्थीची गैरसोय होत असल्याबाबत**

**(१२) ६११४८ (२६-०४-२०२३). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील सेवकांच्या अडवणुकीमुळे मनमाड-नांदगाव (जि.नाशिक) मार्गावरील अनेक गावे व वाड्यातील विद्यार्थी शिक्षणासाठी मिळेल त्या वाहनातून प्रवास करत असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मनमाड-नांदगाव मार्गावर प्रवास करताना विद्यार्थ्यांकडे एसटी बसमधून प्रवास करण्यासाठी त्रैमासिक, मासिक पास उपलब्ध असतांनाही या मार्गावर एसटी वाहनचालक बसमध्ये जागा नसल्याचे सांगत असून विद्यार्थ्यांना बसमध्ये बसविण्यास टाळाटाळ करीत असल्याच्या अनेक तक्रारी पालकांनी व ग्रामस्थांनी मनमाड आगार प्रमुखाकडे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने विद्यार्थ्यांना बसमध्ये बसविण्यास नकार देणाऱ्या संबंधित वाहनचालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-१२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) आगार व्यवस्थापक, रा.प.मनमाड यांचेकडे काही चालक/वाहक मनमाड ते नांदगाव मार्गावरील विद्यार्थ्यांना बसमध्ये घेत नसल्याच्या तक्रारी दुरध्वनीव्दारे प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे मनमाड ते नांदगाव मार्गावर कामगिरी करण्याऱ्या मनमाड आगाराच्या संबंधित चालक / वाहकांना प्रकटनाव्दारे सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच विद्यार्थी मागणीनुसार माहे जुन २०२३ अखेर मनमाड ते नांदगाव मार्गावर रा.प. मनमाड आगारामार्फत एकुण १२ फेऱ्या चालनात आहेत. नांदगाव आगारामार्फत नांदगाव ते मनमाड २३ फेऱ्या चालनात आहेत. सदर मार्गावर मनमाड व नांदगाव अशा दोन्ही आगाराच्या एकुण ३५ फेऱ्या चालनात आहेत.

---

### कोल्हापूर शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या शिंगणापुर बंधाऱ्याबाबत

**(१३) ६१३६० (०८-०५-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरासाठी भोगावती नदीवर बालिंगा व नागदेववाडी उपसा केंद्र तर पंचगंगा नदीवर शिंगणापुर उपसा केंद्र असून सदरील केंद्रावरून सुमारे १६० एमएलडी पाण्याचा उपसा केला जातो हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिंगणापुर बंधाऱ्यावर बरगे घालून पाणी अडिवले नसुन सदर बंधाऱ्याला सुमारे २० गाळे आहेत. त्यापैकी अनेक गळयातून पाणी गळती होऊन परिणामी १६० एमएलडी पाण्याचा उपसा होऊनही शहरवासीयांना पाणी टंचाईचा सामना करावा लागू शकतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तातडीने सदर बंधाऱ्याची दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) शिंगणापूर बंधाऱ्यास सर्व २० गाळयांमध्ये बरगे असून त्यापैकी काही गाळयांमधून पाणी गळती होत होती. सन २०२१ मध्ये निविदा प्रक्रिया राबवून सदर गळती काढून घेण्यात आली असून फेब्रुवारी, २०२३ मध्ये विभागीय स्तरावर देखील बंधाऱ्याची गळती रोखण्यात आली आहे. सद्यस्थितीत बंधाऱ्यास कोणतीही गळती नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर शहरातील पंचगंगा घाट व जुना शिवाजी पुलाचे सुशोभिकरण करण्याबाबत

**(१४) ६१६८३ (२५-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील पंचगंगा घाट व जुना शिवाजी पुल यांची दुरवस्था झाली असल्याने सदर ठिकाणी सुशोभिकरण करण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मा.पालकमंत्री, कोल्हापूर यांनी पंचगंगा घाट व जुना शिवाजी पुल यांचे सुशोभिकरण आरखडयाचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी जिल्हा प्रशासनाने सादर करावेत असे निर्देश दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने पंचगंगा घाट व जुना शिवाजी पुल याचे सुशोभिकरण करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३), नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना सन २०२२-२३ अंतर्गत कोल्हापूर शहरातील पंचगंगा घाट येथील विकासकामे/संवर्धन व आकर्षक विद्युत रोषणाई या दोन कामांची अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर

यांचेकडून तयार करुन घेऊन त्यांचे तांत्रिक मान्यतेनंतर सविस्तर प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांची मान्यता प्राप्त झाली असून पंचगंगा घाट येथील कामे छत्रपती चॅरिटेबल देवस्थान ट्रस्ट, कोल्हापूर यांचे मालकीच्या जागेवर असल्याने या ठिकाणी कामकाज सुरु करण्यासाठी त्यांचे ना-हरकत दाखला घेण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद ते अहमदनगर रेल्वे मार्गाला मंजुरी मिळण्याबाबत**

**(१५) ६२५१० (२५-०४-२०२३). श्री.शंकरराव गडाख (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद ते अहमदनगर या १२० कि.मी. रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा रेल्वे मार्ग झाल्यावर प्रवरासंगम, नेवासा, देवगड, शनि शिंगणापूर ही तिर्थस्थळे जोडली जातील, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रेल्वे मार्गाला केंद्र सरकारकडून मंजुरी मिळण्याबाबत राज्य शासनाकडून पाठपुरावा करण्यात आला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२३) :** (१) होय, औरंगाबाद ते अहमदनगर रेल्वे मार्गाचे (११८ किमी ) सर्वेक्षण जुलै २०२२ मध्ये पूर्ण झाले आणि त्याचा सर्वेक्षण अहवाल रेल्वे बोर्ड ला पाठविला आला असल्याचे मध्य रेल्वे विभागाने कळविले आहे.
(२) होय, हा प्रकल्प पूर्ण झाला की प्रवरा संगम वगळता अन्य सर्व ठिकाणे या रेल्वे प्रकल्पामुळे जोडली जाणार आहेत.
(३) औरंगाबाद-अहमदनगर रेल्वे मार्ग प्रकल्पाचे पुन:श्च सरेखन करण्यात आले असुन सर्वेक्षण अहवाल रेल्वे बोर्डाला पाठविण्यात आला असल्याचे मध्य रेल्वे विभागाने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा (जि.जळगाव) नगर पालिकेच्या विवेकानंद नगर येथील अतिक्रमित बांधकामाबाबत**

**(१६) ६२५१९ (२४-०४-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचोरा (जि.जळगाव) नगर पालिका हद्दीमधील विवेकानंद नगर, गट नं.८१/२, अधिन्यासातील खुल्या जागेवरील अनधिकृत शाळेचे अतिक्रमित बेकायदा बांधकाम तात्काळ निष्कासित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१५ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त ठिकाणचे अतिक्रमित बांधकाम निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) पाचोरा नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे क्र.८२/1 या अभिन्यासातील १९,०१२ चौ.फुट इतक्या क्षेत्रफळापैकी, नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र. १६, दि.२७.०५.१९९१ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार मागणीप्रमाणे १०% जागेवर बांधकाम करण्याच्या अटीवर गिरणाई शिक्षण संस्थेस जागा हस्तांतरीत करण्यात आली असून, याबाबत दि.१८.०३.१९९२ रोजी करारनामा करण्यात आला. सदर बांधकाम अनधिकृत असल्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना

अधिनियम, १९६६ च्या कलम ५२ अन्वये तक्रार दाख़ल करण्यात आली होती. त्यानुषंगाने प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पाचोरा यांच्या न्यायालयात खटला क्र.५५७/१९९८ दाख़ल करण्यात आला होता. सदर प्रकरणी गिरणाई शिक्षण संस्थेची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. सदर प्रकरणी अपिल दाखल करण्यासंदर्भात मुख्याधिकारी, पाचोरा नगरपरिषद यांनी कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ग्रामीण भागातील दिव्यांग व्यक्तीप्रमाणे शहरातील व्यक्तीना शासकीय योजनाचा लाभ मिळणेबाबत

**(१७) ६२६७७ (२५-०४-२०२३). श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागातील दिव्यांग व्यक्तीना ज्या शासकीय योजनांचा लाभ मिळतो त्याप्रमाणेच शहरातील दिव्यांग व्यक्तीना शासकीय योजनेचा लाभ देण्यात येत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुंषगाने शहरी भागातील दिव्यांग व्यक्तीना सुध्दा शासकीय योजनेचा लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ३७ नुसार शासनाच्या सर्व विकास योजनांमध्ये दिव्यांग व्यक्तींना ५ टक्के आरक्षण देण्याची तरतूद आहे. तसेच शासनाच्या इतर योजना उदा. शिष्यवृत्ती योजना, दिव्यांग बीजभांडवल योजना, संजय गांधी निराधार योजना, दिव्यांग-अव्यंग विवाह योजना, कृत्रिम अवयव योजना, इत्यादींसह सर्व योजनांचा लाभ ग्रामिण तसेच शहरी भागातील दिव्यांगांना देण्यात येतो.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नगरपंचायत धानोरा (जि.अमरावती) तालुक्यातील पाणी पुरवठ्याच्या प्रस्तावाबाबत

**(१८) ६२८९१ (२४-०४-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील नगरपंचायत धानोरा तालुका केंद्र असून शहराची वाढती लोकसंख्या व विस्तार लक्षात घेता पाणीपुरवठ्याची सध्या स्थितीतील योजना कमी पडत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याकरिता नगरपंचायत धानोराने वाढीव पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव शासन स्तरावर मंजुरीसाठी पाठवलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रस्तावांतर्गत २५ कोटी रुपये निधीची आवश्यकता असून त्या निधीची उपलब्धता करून देण्यासंदर्भात प्रस्ताव सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने तातडीने निर्णय घेऊन निधीची उपलब्धता करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा नगरपंचायतमार्फत प्रस्तावित पाणीपुरवठा प्रकल्पाच्या अनुषंगाने आवश्यक पाणी आरक्षण मिळवण्यासाठी कार्यवाही सुरु असून सदर पाणी आरक्षण मिळाल्यानंतर पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव तयार करून त्यास तांत्रिक मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येईल असे मुख्याधिकारी, धानोरा नगरपंचायत यांनी कळविले आहे.

धानोरा नगरपंचायतचा पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव तांत्रिक मान्यता व इतर आवश्यक कागदपत्रांसह विहित मार्गाने शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाला दिलेले ५०० हून अधिक धनादेशाबाबत

**(१९) ६३२५५ (१२-०५-२०२३). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर महानगपालिका क्षेत्रातील मालमत्ताधारकांकडून चालू वर्षात १४० कोटी रुपये मालमत्ता कर वसूल करण्यात आला असून अद्यापही जवळपास ६० कोटी रुपये वसूली बाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरण्यासाठी महापालिका प्रशासनाला दिलेले ५०० हून अधिक धनादेश वटलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन ज्या मालमत्ताधारकांचे धनादेश वटलेले नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच उर्वरीत ६० कोटी रुपये वसूली संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-११-२०२३) :** (१) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये मिरा-भाईंदर महानगरपालिका मालमत्ता कर विभागाचे २०० कोटी मालमत्ता कर वसुलीचे उदिष्ट्य होते.

त्यापैकी दि.३१.०३.२०२३ अखेर रू.१८७.७९ कोटी मालमत्ता कर वसुल झाला असुन, उर्वरित मालमत्ता कराची वसुली सुरू असल्याची वस्तुस्थिती आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) ज्या मालमत्ता धारकांचे धनादेश वटलेले नाहीत, अशा मालमत्ता धारकांविरूध्द अधिनियमातील तरतूदीनुसार ५५२ थकबाकीदारांना नोटीस बजाविण्यात आलेल्या आहेत.

त्यापैकी ४९९ मालमत्ता धारकांनी दंडासह मालमत्ता कराचा भरणा केलेला असून, त्याची रक्कम रू.१.३६ कोटी इतकी आहे.

उर्वरित ५३ मालमत्ता धारकांकडून रू. १०.५७ लक्ष इतकी मालमत्ता कर दंडासह वसुल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

धनादेश परत आलेनंतर पुन्हा करण्यात येणाऱ्या मागणी रक्कमेत नोंद करून रू.१५०/- इतका दंड आकारण्यात येतो. तसेच, थकीत रक्कमेवर व्याज देखील आकारण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील कल्याण डोंबिवली व अंबरनाथ येथील २७ गावांचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी राबविण्यात येणारी ‘अमृत योजना’ प्रलंबित असल्याबाबत

**(२०) ६३५२० (२४-०४-२०२३). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली व अंबरनाथ येथील २७ गावांचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी राबविण्यात येणारी ‘अमृत योजना’ तातडीने पूर्णत्वास न्यावी याकरीता स्थानिक रहिवाशी व लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेसाठी आवश्यक असलेल्या जमीनीचे अधिग्रहण न झाल्याने सदर योजना प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना पूर्णत्वास नेण्यास येत असलेल्या त्रुटी तातडीने दुर करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणत्या उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत कल्याण डोंबिवली शहराच्या रुपये १९४.२० कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक १८ डिसेंबर, २०१८ रोजी प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली असून सदर प्रकल्पाचे दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

सदर प्रकल्पाच्या ७ उंच जलकुंभाच्या मूळ जागा उपलब्ध न झाल्याने नवीन जागा ठेकेदारास देण्यात आलेल्या असून सदर टाक्यांचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच, ८ उंच जलकुंभाच्या जागा जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून दिनांक ७ मे, २०२२ रोजी ताबा मिळाल्यानंतर दिनांक १७ मे, २०२२ रोजी ठेकेदारास देण्यात आलेल्या आहेत.

सदर प्रकल्पातील खाजगी विकासकाच्या व ग्रामपंचायत ताब्यातील आरक्षणाच्या १० जागा टप्याटप्याने डिसेंबर, २०२२ पर्यंत ताब्यात घेऊन ठेकेदारास दिलेल्या आहेत. तसेच, ४ जागा जिल्हाधिकारी, ठाणे यांनी ताब्यात दिल्यानंतर ठेकेदारास उपलब्ध करून दिलेल्या आहेत. उर्वरित एका जागेचा आगाऊ ताबा घेण्यात आलेला आहे. सबब, सर्व २८ उंच जलकुंभाचे व २ भूस्तर टाक्याच्या जागा अधिगृहित करण्यात आलेल्या असून सद्यस्थितीस सदर प्रकल्पाची भौतिक प्रगती ५२ % झालेली असून सद्यस्थितीस प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पाच्या कामाच्या प्रगतीच्या अनुषंगाने शासन स्तरावरून वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.

---

## राज्यातील निराधार व्यक्तींना मिळणाऱ्या संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन निधीमध्ये वाढ करण्याबाबत

**(२१) ६४६०१ (३१-०८-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागाने संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन या दोन्ही योजनांमधून राज्यातील निराधार व्यक्तींना रुपये ११९७ कोटी निधी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करुन दिल्याचे दिनांक ३० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये अद्यापपर्यंत पैसे जमा झालेले आहेत काय,
(३) तसेच सदर योजनेसाठी वयाची अट ६५ वरुन ६० करण्याची होत असलेली मागणी शासनाने फेटाळली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) शासनाने संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेच्या निराधार लाभार्थ्यांचे अनुदान १ हजार रुपयाहून १५०० रुपये करण्याची घोषणा मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान करुन अद्यापही निराधारांना १५०० रुपये वाढीव अनुदान देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विविध निराधार व्यक्तींना आर्थिक मदत मिळण्यासाठी सदर योजनेसाठी वयाची अट कमी करण्यासाठी आणि लाभार्थ्यांच्या निधीमध्ये वाढ करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-११-२०२३) :** (१) सन २०२३-२४ आर्थिक वर्षात संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन या योजनांकरीता सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना रु.३१७८ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(२) विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना सर्वसाधारणपणे माहे जून २०२३ पर्यंतचे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले असून माहे जुलै, २०२३ पासून अर्थसहाय्य वितरणाची कार्यवाही तालुका स्तरावर सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन या योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात दरमहा रु.१००० वरुन रु.१५०० इतकी वाढ विभागाच्या दिनांक ०५.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. तसेच श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेकरीता असलेली वयोमर्यादा ६५ वर्षावरुन ६० वर्ष करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## नागपूर महानगरपालिकेच्या लीजवर दिलेल्या भूखंडांच्या नूतनीकरणाबाबत

**(२२) ६४७९२ (२५-०८-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरविकास विभागाने सन २०१९ मध्ये लीजवर दिलेल्या भूखंडांच्या नूतनीकरणासंदर्भात जाहीर केलेल्या शासन निर्णयात अनेक क्लिष्ट बदल समाविष्ट केल्यामुळे नागपूर महानगरपालिकेने लीजवर दिलेल्या सुमारे चार हजारांहून अधिक भूखंडधारकांचे नूतनीकरण प्रलंबित राहिले असल्याची गंभीर बाब दिनांक २९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बदलांमुळे लीजधारकांना ग्राऊंड रेंटच्या नावाखाली लाखो रुपयांचा भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्राऊंड रेंट न भरणाऱ्या लीजधारकांकडून नागपूर महानगरपालिका तब्बल २४ टक्के दंड आकारणी करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि नागपूर महानगरपालिकेने लीजवर दिलेल्या भूखंडांच्या नूतनीकरणासंदर्भात राबविलेल्या अन्यायकारक धोरणात तातडीने बदल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-११-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.

महानगरपालिका ठराव क्र.२९९ दि.२०.१०.२०१८ नुसार महानगरपालिकेच्या नूतनीकरणाबाबत कार्यवाही करण्यात येत होती.

दरम्यान दि.१३ सप्टेंबर,२०१९ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेअन्वये भाडेपट्टयाचे दर निश्चित करण्यात आले. यामध्ये सुधारीत दरानुसार मालमत्तेच्या मुल्यांकनाच्या ८% रक्कम किंवा, बाजारभावानुसार निश्चित होणारे वार्षिक भाडे, यापैकी जे जास्त असेल तेवढे वार्षिक भाडे या समितीमार्फत निश्चित करण्यात आले.

(२) नाही, हे खरे नाही.

सदर अधिसूचनेवर ६ एप्रिल २०२२ रोजीच्या पत्रान्वये स्थगिती देण्यात आली असल्याने पुढील आदेशापर्यंत हमीपत्र घेऊन मनपा ठराव क्र. २९९ दि. २०.१०.२०१८ नुसार रहिवासी वापराकरिता ०.०२ % भाडेपट्टयाची आकारणी करण्यात येत आहे.

(३) महाराष्ट्र शासन अधिसुचना दि.१३ सप्टेंबर, २०१९ नुसार ज्या प्रकरणात भाडेपट्याची रक्कम संबंधितांनी भरलेली नसेल, अशा प्रकरणाबाबत दरमहा २% इतके व्याजासह आकारणी करण्यात येत आहे.

(४) राज्य शासनाने दि.१०ऑक्टोबर, २०२३ रोजी भाडेपट्टयाचे दर सुधारित केले असून याबाबतची अधिसूचना प्रसिध्द करण्याची कार्यवाही शासनाच्या स्तरावर सुरू आहे.

---

## ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील मौजे सोनिवली व म्हाडा कॉलनी येथील बीएसयुपी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना घरे वाटप करण्याबाबत

**(२३) ६५८१८ (२५-०८-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील मौजे सोनिवली व म्हाडा कॉलनी येथील बीएसयुपी योजनेअंतर्गत घरकुले बांधून तयार असून, आजतागायत लाभार्थ्यांना या घरांचे वाटप करण्यात आले नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीएसयुपी योजनेअंतर्गत घरांचे बांधकामे कधी पूर्ण झाले आहेत तसेच अद्याप लाभार्थ्यांना ताबा न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर घरांचे वाटप करण्यात न आल्याने मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्यामुळे या इमारतीचा दुरुस्तीचा खर्च नगरपरिषदेकडून करण्याबाबत शासन आदेश देणार असून, सदरहू देखभाल व दुरुस्तीचा खर्च कोणत्या निधीतून करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने लाभार्थ्यांना घरांचा ताबा न देणाऱ्या संबंधितांविरुद्ध कारवाई करुन लाभार्थ्यांना घराचे वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) (३) व (४) कुळगांव बदलापूर नगरपरिषद क्षेत्रात जवाहर नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान कार्यक्रमांतर्गत शहरी गरीबांकरीता मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या घटकाखाली एकूण ९०४ घरकुलांपैकी ४९३ घरांचे वाटप करण्यात आले असून सोनिवली येथील घरकुलांच्या इमारतीचा वापर कोरोना-१९ आपत्तीवेळी विलगीकरण कक्ष म्हणून वापर केलेला असल्याने वाटप करण्यास विलंब झाला होता. कोरोना संपल्यानंतर वाटपाचे काम करण्यात आले असून उर्वरित घरांचे वाटप दि.२६/१०/२०१८ च्या शासन निर्णयान्वये या योजनेअंतर्गत घरकुलांच्या लाभापासून वंचित राहीलेले मुळ पात्र लाभार्थी यांनी स्व-हिस्सा भरल्यानंतर, तसेच प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्र लाभार्थी व नगरपरिषद हद्दीतील सरकारी रस्ता / प्रकल्पामध्ये बाधित लोकांना घरे वाटप करण्याची कार्यवाही नगरपरिषदेकडून करण्यात येत आहे.

लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या घरांची देखभाल व दुरुस्ती लाभार्थी करत असून उर्वरित घरांच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च नगरपरिषदेच्या फंडातून करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील शिरगाव, बदलापूर (पूर्व) येथील मॅरेथॉन नगरी समोरील रस्त्याबाबत

**(२४) ६५८४५ (३१-०८-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपालिका हद्दीतील शिरगाव, बदलापूर (पुर्व) येथील मॅरेथॉन नगरी समोरील रस्ता दिनांक २५ जुलै, २००५ रोजी मंजुर करण्यात आला असून विकास आराखड्यानुसार तयार करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या जागेवर अनधिकृत बांधकाम करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक वर्षापासून उक्त मार्ग प्रतिक्षेत असल्याने येथील स्थानिक रहिवाशी गत काही वर्षापासून रस्त्यासाठी प्रयत्नशील असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्ता लोकोपयोगासाठी मोकळा करण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२३) :** (१) कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या हद्दीतील मौजे शिरसगांव बदलापूर (पूर्व) येथील मॅरेथॉन नगरी समोरील रस्ता विकास योजनेप्रमाणे अंशत: अस्तित्वात असून उर्वरित रस्ता वहिवाटीप्रमाणे करण्यात आलेला आहे.
(२) ताब्यात असलेल्या विकास योजना रस्ता व वहिवाटीच्या रस्त्यावर कोणतेही पक्के अनधिकृत बांधकाम नसून प्रस्तावित विकास योजना रस्ता व पार्किंग आरक्षण असलेल्या खाजगी जमीनीवर पत्र्याचे शेड आहे. अस्तित्वातील वापरात असलेला वहिवाटीचा रस्ता पूर्ण करण्याबाबत स्थानिक रहिवाश्यांची मागणी आहे.
(३) सदर रस्ता विकास योजनेप्रमाणे अंशत: तयार करण्यात आलेला असून रस्त्याने बाधित काही जमिन खाजगी मालकीची व पार्किंग या आरक्षणालगत आहे. सदर जागा ताब्यात आल्यानंतर संपूर्ण रस्ता विकास योजनेप्रमाणे संलग्न करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.
(४) विकास योजनेप्रमाणे अंशत: तयार करण्यात आलेल्या रस्त्यामधील बाधित खाजगी जमिन नगरपरिषदेच्या ताब्यात आल्यानंतर संपूर्ण रस्ता विकास योजनेप्रमाणे तातडीने संलग्न करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, ठाणे यांना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील काटई (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील जलकुंभाच्या सुरु असलेल्या बांधकामाचा भाग कोसळल्याबाबत**

**(२५) ६६६९४ (२७-०८-२०२३). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या ग्रामीण भागात अमृत योजनेतून १७ जलकुंभ उभारण्याचे काम निकृष्ट दर्जाचे व संथगतीने सुरु असल्याचे माहे मे २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काटई (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील जलकुंभाच्या सुरु असलेल्या बांधकामाचा काही भाग दिनांक १५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास कोसळला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर निकृष्ठ दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर व संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-११-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
दि.१५.०५.२०२३ रोजी काटई येथील उंच जलकुंभाचा बॉटम स्लॅब भरतेवेळी जलकुंभाच्या गॅलरीतील सेंट्रीगला लावलेल्या सपोर्टमुळे काही भाग हलला व त्यामुळे टाकीच्या बॉटम स्लॅबच्या भागावरील ओले कॉंक्रीट खाली पडले. बांधकाम पूर्ण झालेला भाग कोसळलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(३) व (४) सदर कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.
सदर सेंट्रीगचा काही भाग कोसळल्यानंतर ठेकेदाराकडून खुलासा मागविण्यात आला आहे.

सेंट्रींगचा भाग निखळला या घटनेबाबत VJTI मुंबई या संस्थेचा तांत्रिक लेखा परीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सूचनेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

सद्यस्थितीत आरसीसी कन्सल्टंट यांच्याकडून तपासणी करून घेऊन सेंट्रीगचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या परवानगीनुसार टाकीच्या बॉटम स्लॅबचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

सदर भरलेल्या स्लॅबचे क्युब टेस्टींगचे तपासणी ही VJTI या शासकीय अभियांत्रिकी विद्यालय, महानगरपालिका प्रयोगशाळा व SKG Project & ENGG PVT. LMD या प्रयोग शाळेत करण्यात आले असून सर्व रिपोर्ट समाधानकारक आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील पृथ्वी हाऊसिंग आणि लॅण्ड डेव्हलपर या विकासकाने नैसर्गिक नाल्यावर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(२६) ६६६९९ (२७-०८-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर पूर्वेकडील पूनम पार्क रस्त्यावरील पृथ्वी हाउसिंग आणि लँण्ड डेव्हलपर या विकासकाने व अन्य बांधकाम व्यवसायिकांनी पालघर नगरपरिषद हद्दीतील नैसर्गिक नाल्यावर अनधिकृत बांधकामे करून नाले बुजवल्याने नाल्यांचे अस्तित्व संपुष्टात येत आहे. नैसर्गिक पाण्याचा निचरा व्यवस्थापन करणारे हे नाले काही ठिकाणी बुजविले तर काही ठिकाणी अरुंद झाले आहेत, परिणामी पावसाच्या पाण्याचा आणि सांडपाण्याचा निचरा होण्यास अडथळे निर्माण होऊन, पालघरमध्ये पूरस्थिती निर्माण होणार असल्याने सदरहू अनधिकृत बांधकामाविरोधात तेथील नागरिकांनी तसेच नगरसेवकांनी मुख्याधिकारी पालघर नगरपरिषद यांचेकडे मागील एक वर्षाहून अधिक कालावधीपासून सातत्याने लेखी निवेदने सादर करून या बेकायदेशीर बांधकामावर विनाविलंब कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर नगरपरिषद हद्दीतील नैसर्गिक नाल्यांवर पृथ्वी हाउसिंग आणि लँण्ड डेव्हलपर या विकासकाने व अन्य बांधकाम व्यवसायिकांनी अनधिकृत बांधकामे केली असल्याने नाल्यांचे अस्तित्व संपुष्टात आल्याने या प्रकरणी विनाविलंब संबंधित विकासकाविरोधात लेखी निवेदनाद्वारे सातत्याने मागणी करूनही त्याकडे मुख्याधिकारी तसेच पालघर नगरपरिषद प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष झाले असून कारवाई करण्यास होत असलेल्या दिरंगाईमुळे तसेच अधिकारी यांचे अर्थपूर्ण संबंधामुळे अनधिकृत बांधकामा पाठीशी घालीत असल्याच्या निषेधार्थ नगरसेवकासह नागरिकांनी नगर परिषद मुख्यालयासमोर माहे एप्रिल २०२३ मध्ये वा त्यादरम्यान बेमुदत उपोषण सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अंती काय आढळून आले व त्यानुसार अनधिकृतरित्या नाल्यांवर बांधकाम करणाऱ्या विकासका विरोधात तसेच या अनधिकृत बांधकामास पाठीशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२३) :** (१) सदर बांधकामाबाबत नागरीकांनी व नगरसेवकांनी नगरपरिषदेकडे तक्रार केलेली असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. सदरच्या नाल्यावर विकासकाने कल्व्हर्ट स्वरुपाचे बांधकाम केलेले असून त्यामुळे पुरपरिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येत नाही.

(२) व (३) सदर विकासकाविरोधात पालघर नगरपरिषदेसमोर आमरण उपोषण करण्यात आले होते. दरम्यानच्या काळात पदनिर्देशित अधिकारी, यांनी कामाची स्थळपाहणी केली असून त्याबाबतचा पंचनामा केला आहे. त्यानुसार विकासकाला नोटीस बजावून काम थांबविण्याचे निर्देश दिले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने कल्व्हर्टबाबत

सर्वसाधारण मांडणी आराखडा (GAD) संकल्पचित्र मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार नगरपरिषदेने कार्यवाही केली असून त्यांचेकडील अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५१ व ५२ अन्वये नगरपरिषदेने दिलेल्या नोटीशीविरोधात विकासकाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन दाखल केली आहे. त्यास मा.न्यायालयाने स्थगिती दिली असून सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) याप्रकरणी कार्यवाही करण्यास नगरपरिषदेने दिरंगाई केली नसून विकासकाने नैसर्गिक नाल्यावर केलेले बांधकाम अनधिकृत असल्याचे आढळल्यास त्यांचेविरोधात नियमानुसार कार्यवाही करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत दुसरी मुजतवाढ संपुष्टात आल्यानंतर देखील रस्त्यांची कामे पूर्ण न झाल्याबाबत

**(२७) ६७००१ (२७-०८-२०२३). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत दुसरी मुदतवाढ संपुष्टात आल्यानंतर देखील मंजूर करण्यात आलेल्या १७१ रस्त्यांपैकी केवळ ६८ रस्ते पूर्णत्वास आलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार स्मार्ट सिटी योजनेला मुदतवाढ दिल्यानंतर देखील रस्ते पूर्णत्वास न जाण्याची कारणे कोणती आहेत,

(३) असल्यास, नाशिक स्मार्ट सिटी योजनेत रस्त्यांची कामे पूर्णत्वास न आल्यामुळे गावठाण भागात राहणाऱ्या लोकांच्या रस्त्याची समस्या गंभीर झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नाशिक स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत योग्य प्रकारे सर्वेक्षण न करणाऱ्या तांत्रिक सल्लागार व वेळेत काम न करणाऱ्या ठेकेदारावर व योग्यरीतीने काम पूर्ण न करून घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

मुळ मंजूर निविदेतील १७१ रस्त्यांपैकी, पूर्ण व्याप्तीची ९२ व अंशत: व्याप्तीची ३६ अशी एकुण १२८ रस्त्यांची कामे पुर्ण झाली असून ४३ कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) मुख्य बाजार पेठ, अरुंद गल्ल्या, जुन्या धोकादायक इमारती व पर्यायी रस्ता उपलब्ध नसल्यामुळे कामे करण्यांस विलंब होत आहे.

(३) हे खरे नाही.

नाशिक पंचवटी गावठाणातील अरुंद रस्त्यांची कामे यंत्रसामुग्रीद्वारे करणे शक्य होत नाही, त्यामुळे मनुष्यबळाचा वापर करुन कामे करावी लागत आहेत. परंतु आता सदरच्या परिसरातील बहुतांशी कामे पुर्ण झाली आहेत.

(४) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (मे.केपीएमजी मुंबई व सहभागीदार मे.वाडीया इंजिनिअरींग सर्व्हीसेस लि.) यांचेकडून अपेक्षित अंमलबजावणी व देखरेख न झाल्यामुळे करारनाम्यानुसार रु.३.११५ कोटीची नुकसान भरपाई लादण्यांत आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खेड नगरपरिषदेच्या (जि.रत्नागिरी) हद्दीतील हरितपट्टा असलेला राखीव भूखंड शिवतेज आरोग्य संस्थेला देण्याचा मंजूर केलेला ठराव

**(२८) ६७०३७ (२७-०८-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील खेड नगर परिषदेच्या हद्दीतील हरितपट्टा असलेला राखीव भूखंड माजी पर्यावरणमंत्री हे अध्यक्ष असलेल्या शिवतेज आरोग्य संस्थेने ९९ वर्षाच्या नाममात्र भाडे पट्टयावर कराराने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माजी पर्यावरणमंत्री यांनी पदाचा गैरवापर करुन हरितपट्टयाच्या भूखंडावरील आरक्षण उठवून नगरपरिषदेवर दबाव टाकून हरितपट्टा म्हणून घोषित केलेला सुमारे १६ हजार चौ.मी.चा भूखंड शिवतेज आरोग्य संस्थेला देण्याचा ठराव मंजूर करुन घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माजी पर्यावरणमंत्री यांनी पदाचा गैरवापर करुन भूखंडावरील आरक्षण उठवून हरितपट्टा घोषित केल्याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२३) :** (१) हे खरे आहे

(२) (३) व (४) खेड शहराच्या विकास आराखडयामध्ये सि.स.नं.१४९० (पै) १६०० चौ.मी. ही खुली जागा शिवतेज आरोग्य सेवा संस्था, खेड या संस्थेस सामाजिक उपक्रमाकरीता ९९ वर्षाच्या भाडे कराराने देण्यात आली होती. मंजूर विकास योजनेमध्ये सदर भूखंडाची जागा आरक्षित नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर जागा हरीत पट्यातून वगळून रहिवास विभागात समाविष्ठ करण्यासाठी नगरपरिषदेने दि.२०/१०/२०१८ रोजी सर्वसाधारण ठराव करुन त्याप्रमाणे फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला. त्यानुसार शासन अधिसूचना दिनांक ०६/१२/२०१८ अन्वये मौजे खेड येथील सि.स.नं.१४९० (भाग) क्षेत्र सुमारे १६०० चौ.मी.हे “व्यायामशाळा व बहुउद्देशीय सभागृह” या प्रयोजनार्थ आरक्षित केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औसा (ता.औसा, जि.लातूर) येथे जलशुध्दीकरण प्रकल्प सुरु करण्याबाबत

**(२९) ६७१३६ (२७-०८-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (ता.औसा, जि.लातूर) येथे केंद्र शासन व औसा नगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या माध्यमातून दुष्काळी परिस्थितीत तेथील जनतेला शुध्द पाणीपुरवठा करण्यासाठी २ कोटी रुपये खर्च करुन जलशुध्दीकरण प्रकल्प उभारण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्प हा सद्य:स्थितीत बंद असून, तेथील यंत्रसामुग्री विनावापर पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू जलशुध्दीकरण प्रकल्प केव्हापासून बंद आहे तसेच प्रकल्प बंद पडण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त जलशुध्दीकरण प्रकल्प बंद असल्यामुळे तेथील नागरीकांना एका पाण्याच्या जारसाठी २० रुपये अधिक मोजावे लागत असल्यामुळे जलशुध्दीकरण प्रकल्प त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) केंद्र शासन व औसा नगरपरिषदेच्या संयुक्त विद्यमाने रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या माध्यमातून उभारण्यात आलेला जलशुद्धीकरण प्रकल्प, अपुर्ण असताना नगरपरिषदेकडे हस्तांतरीत करुन घेण्यात आल्यामुळे प्रकल्प यशस्वीरित्या पुर्ण चालू शकला नाही.

सदर जलशुद्धीकरण प्रकल्पातील शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पडद्याचा (Membranes) भाग नादुरुस्त असल्यामुळे प्रकल्प मागील २ वर्षापासून बंद आहे. तथापि, सदर प्रकल्पातील आवश्यक ती दुरुस्ती करुन जलशुद्धीकरण प्रकल्प सुरु करण्याची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.
(४) सद्यस्थितीत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत औसा शहर पाणी पुरवठा योजनेचे काम पुर्ण झाले असून, नागरिकांना नळाद्वारे नियमित शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भुसावळ नगरपरिषदेमधील गैरव्यवहाराबाबत नेमलेल्या त्रिस्तरीय समितीने अहवाल परस्पर दिल्याबाबत

**(३०) ६७२३२ (२७-०८-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ शहरातील नगरपरिषदेमध्ये झालेल्या विविध गैरव्यवहाराबाबत शासनाकडे तक्रार झाल्याने शासनाने जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारी व त्यांच्यासोबत दोन सदस्य असे त्रिस्तरीय सदस्य समिती नेमून सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीने आपला अहवाल दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी सभागृहात झालेल्या लक्षवेधी सूचना व प्रश्नांवर चर्चा झाल्यानंतर तातडीने जिल्हाधिकारी यांच्याकडे मूळ तक्रारदाराला न बोलविता दिला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने स्वयंस्पष्ट आदेश दिल्यानंतर सुद्धा जिल्हा नगरपालिका प्रशासन यांनी मूळ तक्रारदाराला न बोलविल्यामुळे, तक्रारदाराने दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी वात्यासुमारास जिल्हाधिकारी, जळगाव यांना मेलद्वारे सदर प्रकरणी सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मेल प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी, जळगाव यांनी उक्त प्रकरणी चौकशी करुन जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारी यांनी तक्रारदाराला न बोलवता अहवाल दिल्याबद्दल, जिल्हा प्रशासन नगरपालिका अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही,

जिल्हा प्रशासन अधिकारी, जळगाव यांनी दि.२८ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रान्वये अर्जदार यांना सदर प्रकरणी चौकशी समिती गठीत करण्यात आली असून, तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासंदर्भात आवश्यक कागदपत्र समितीस सादर करण्याबाबत कळविले होते.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरातील पंचगंगा स्मशानभूमीतील असुविधेबाबत

**(३१) ६७३५४ (३१-०८-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील पंचगंगा स्मशानभूमी येथे प्राथमिक सोई सुविधा व स्मशान भूमी कर्मचारी पदे रिक्त असल्यामुळे मृत व्यक्तींच्या नातेवाईक यांना अंत्यसंस्कार करताना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर महानगरपालिका तसेच स्थानिक प्रशासन यांच्याकडे मनुष्यबळ कमी असल्याने मृत व्यक्तीवर अंत्यसंस्कार करताना लाकूड तोडण्यासह इतरही कामे त्या कर्मचाऱ्यांना करावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उपरोक्त ठिकाणी स्मशानभूमीची शेड खराब असल्यामुळे पावसाळ्यात पावसाचे पाणी त्यातून गळते व उन्हाळ्यात प्रचंड उन्हामुळे मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना गैरसाईंना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन पंचगंगा स्मशानभूमी परिसर विकास करण्यासाठी नवीन स्मशान शेड उभारण्यासाठी निधीची तरतूद करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२३) :** (१) पंचगंगा स्मशानभूमीकरीता एकूण १४ मंजूर पदे असून सद्यस्थितीत संपूर्ण पदे कार्यरत आहे. आवश्यकतेनुसार कर्मचारी संख्या उपलब्ध असल्यामुळे अंत्यसंस्कार कामी कोणतीही गैरसोय होत नाही.

(२) पंचगंगा स्मशानभूमीकडे उद्यान विभागाकडून तसेच नागरीकांकडून मोठया झाडांचे बुंदे प्राप्त होत असल्याने सदरचे लाकूड ठेकेदाराकडून फोडण्यात येते. तसेच जास्त आकाराचे लाकूड मशिनव्दारे कापून घेतल्या जाते.

(३) पंचगंगा स्मशानभूमीतील १२ दहन बेड ज्वालामुळे खराब झाल्याने त्याठिकाणी नवीन शेडचे बांधकाम महानगरपालिका स्वनिधीमधून मंजूर करण्यात आले असून त्या जागेवर काम सुरु आहे.

(४) पंचगंगा स्मशानभूमी परिसर विकास करणे, नवीन स्मशानशेड उभारण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) २०२२-२३ च्या अनुदानातून रु.२.३० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. सदर कामाची निविदा प्रसिध्द झाली असून मंजूरीच्या प्रक्रियेत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरातील कोटीतीर्थ तलावाच्या संवर्धनाबाबत

**(३२) ६७३५६ (३१-०८-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील कोटीतीर्थ तलाव संवर्धन आणि सुशोभीकरण अत्यंत गरजेचे असल्याने वर्षानुवर्षे तलावात साठलेला गाळ व जलपर्णी वनस्पती काढण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिक यांनी स्थानिक प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त तलावाला संरक्षण भिंत नसल्याने अतिक्रमणे होण्याची दाट शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी प्रशासनाने निधीची तरतूद करुन तलावाच्या संवर्धनासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) कोटीतीर्थ तलावाची सीमा ही निश्चित असल्याने अतिक्रमण होण्याची शक्यता नाही.

(३) कोटीतीर्थ तलावाचे पुनर्जीविकरण करण्यासाठी पंधराव्या वित्त आयोग मधून रु.२,५०,९९,६३८/-इतक्या रकमेची निविदा प्रसिध्द केली आहे. यामध्ये विविध कामांचा समावेश असून त्याबाबतचा कार्यादेश दि.०९/०८/२०२२ रोजी

देण्यात आले आहे. सद्य:स्थितीत ९० टक्के पूर्ण काम झाले असून उर्वीरित कामे तातडीने करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर शहराकरीता विशेष अनुदानाची तरतूद करुन गटारे, चॅनेल व नाले दुरुस्त करण्याबाबत

**(३३) ६७३५७ (३१-०८-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील पावसाचा पाण्याचा निचरा होणारी व्यवस्था (गटारे, चॅनेल, नाले) अदृश्य होण्याच्या मार्गावर असल्याने परिणामी पर्यायी पाणी रस्त्यावरच वाहत असून त्यामुळे सर्वसामान्य नागरिक व वाहनधारक यांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील ताराराणी चौक ते मध्यवर्ती बस स्थानक व रेल्वे स्टेशनच्या समोरच्या रस्ता यासह जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील गटारे बंद झाल्यामुळे कायमच सदर ठिकाणी रस्त्यावर पाणी वाहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक प्रशासनाने यावर कायमस्वरूपी तोडगा काढून शहरातील गटारे, चॅनेल, नाले तातडीने दुरुस्त करावेत अशीही मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने माहिती घेऊन कोल्हापूर शहराकरीता विशेष अनुदानाची तरतूद करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात ये आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) कोल्हापूर शहरातील ताराराणी चौक ते मध्यवर्ती बस स्थानक व रेल्वे स्टेशन समोरचा रस्ता आय. आर.बी.मार्फत विकसित केलेला असून सदर रस्त्याच्या बाजूचे चॅनेल भूमिगत केले आहे. ज्या ठिकाणी कनेक्टिव्ही नाही, त्या ठिकाणी अंदाजपत्रके तयार केली असून निधी उपलब्ध होताच गटर चॅनेलचे काम करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ज्या ठिकाणी पाणी साठते, त्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत चॅनेलचे बांधकाम सुरु आहे.
(३) सदर प्रकरणी कायमस्वरुपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने प्राप्त निधीमधून गटर व चॅनेल/नाल्याची कामे महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.
(४) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजना राज्यस्तर) अंतर्गत शहरातील पर्जन्य जलवाहिनी, नाला बांधणी व मजबुतीकरण कामांसाठी एकूण रु.५२.१३ कोटी अनुदान मंजूर केले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक रोड भागात महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी बांधलेल्या इमारतींचा उपयोग होत नसल्याबाबत

**(३४) ६७६६० (२७-०८-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेने नाशिक रोड भागात महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी सुमारे ४ कोटी रुपये खर्च करुन बांधलेली इमारत, नाशिकच्या पूर्व विभागासह सातपूर विभागात लाखो रुपये खर्च करुन रुग्णालय, अभ्यासिका व व्यायामशाळा बांधल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या इमारतींचा वापर होत नसल्यामुळे इमारतींचा दुरुपयोग होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) नाशिक रोड विभागातील बिटको हॉस्पीटल शेजारी "फायर ब्रिगेड स्टेशन" व क्वार्टर साठी इमारत बांधणेत आली असून सदर इमारतीचा भागश: वापर अग्नीशमन विभाग व बिटको हॉस्पीटलचे रहिवासी व कार्यालयाचे वापरासाठी करणेत येत आहे.

तथापी अनधिकृत वापरात असलेल्या इमारती महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन, मनपा अंगणवाडी, आरोग्यवर्धिनी केंद्र,तसेच तसेच इतर संस्था यांचे मागणीनुसार शैक्षणिक,सामाजिक व तत्सम वापरासाठी मनपाचे नियमानुसार देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. नाशिक महानगरपालिकेस सदयस्थितीत फायरमनची पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे, सदर भरती झाल्यानंतर बांधलेल्या इमारतीतील निवासस्थाने कर्मचाऱ्यांना वाटप करण्यात येतील.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक शहरातील नेहरु उद्यानाची झालेली दूरवस्था

**(३५) ६७६६४ (२४-०८-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील नेहरु उद्यानाचे शहर सुशोभिकरणाअंतर्गत स्मार्ट सिटीच्यावतीने कोटयवधी रुपये खर्च करुन हे उद्यान नाशिक महानगरपालिकेच्या ताब्यात माहे जुलै, २०२० मध्ये दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त उद्यान महानगरपालिकेने अद्यापही तेथील नागरीकांसाठी खुले केलेले नसल्यामुळे या उद्यानाची दूरवस्था झाली असून या उद्यानाच्या परिसरात मोठया प्रमाणात अतिक्रमण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार उद्यान नागरीकांसाठी खुले करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२३) :** (१) सदरचे उद्यान स्मार्ट सिटीकडुन मार्च २०२२ मध्ये नाशिक महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे.
(२) व (३) सदर उद्यान नागरीकांकरीता खुले आहे. उद्यानाची दुरावस्था झाली नसुन ते सुस्थितीत आहे.
अतिक्रमणाबाबत अंशत: खरे आहे.
सदर उद्यानाचे परिसरात पक्क्या स्वरुपाचे बांधकाम नाही.या अतिक्रमणाबाबत अतिक्रमण विभागाकडून नियमितपणे कार्यवाही करुन अतिक्रमणधारकांचे साहित्य जप्त केले जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण पूर्वे (जि.ठाणे) येथील सिध्दार्थनगरातील बाधितांना बीएसयुपी योजनेतून घरे देण्याबाबत

**(३६) ६८१२२ (३१-०८-२०२३). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील कल्याण पुर्वेतील सिध्दार्थनगरातील १७ घरे ही एकात्मिक शहर विकास आराखडयांतर्गत रस्ता विकसित करण्यासाठी बाधित झाली होती मात्र २२ वर्षे होऊन अद्याप त्यांना न्याय मिळाला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिध्दार्थ नगरातील १७ बाधित घरे सन २००० मध्ये तोडण्यात येऊन ही एकात्मिक विकास आराखडयानूसार रस्ताच झाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेने एकात्मिक शहर विकास आराखडयांतर्गत कार्यवाही केलेल्या १७ घरांना बीएसयुपी योजनेच्या माध्यमातून घरे देण्याची मागणी या बाधितांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-११-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात विकासकामाने बाधित होणाऱ्या नागरिकांचे पुनर्वसन करणेकरीता महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रस्तावास दि.१२.१२.२०२२ रोजी मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार १६ पात्र बाधितांना दि.०१.०३.२०२३ रोजी जाहिर सोडत काढून उंबर्डे येथील सदनिका जाहिर केल्या आहेत.

तथापि सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र. ६०/२०२३ मधील दि.३१.०३.२०२३ च्या स्थगिती आदेशानुसार लाभार्थ्यांना चाव्या हस्तांतरीत करण्यात आलेल्या नव्हत्या, ही वस्तुस्थिती आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर जागेव्यतिरिक्त इतर भागातील रस्त्यांची कामे करण्यात आलेली आहेत.

(३) होय, हे खरे आहे.
(४) मा. उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र. ६०/२०२३ मधील स्थगिती दि.२९.०८.२०२३ च्या आदेशान्वये उठविण्यात आली असून, लवकरच पात्र सदनिकाधारकांना चाव्यांचे वाटप करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बीड जिल्ह्यातील विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(३७) ६८१६१ (३१-०८-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यात एकूण १० विशेष सहाय योजनांना मागील वर्षात वेळेवर निधी उपलब्ध न झाल्याने लाभार्थी दहा ते अकरा महिने मानधनापासून वंचित राहिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेतील लाभार्थी यांना मिळणारे अनुदान अत्यंत तुटपुंजे असून सदर अनुदानावरच त्यांचा उदरनिर्वाह चालत असतो त्यामुळे विशेष सहाय योजनांना एप्रिल, २०२३ ते जून, २०२३ साठी त्वरित निधी उपलब्ध करुन देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (केज विधानसभा) यांनी राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय मंत्री यांचेकडे दिनांक ३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त जिल्ह्यातील विशेष सहाय योजनांना निधी उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०६-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) बीड जिल्ह्यातील विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना माहे जून २०२३ पर्यंतचे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले असून माहे जुलै २०२३ पासून अर्थसहाय्य वितरणाची कार्यवाही तालुका स्तरावर सुरु आहे.

---

## नाशिक शहरातील नागरिकांना खड्डयातून प्रवास करत लागत असलेबाबत

**(३८) ६८८४० (२७-०८-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात महाराष्ट्र नॅचरल गॅस कंपनी आणि जिओ डिजीटल फायबर या कंपन्यांनी शहरातील १३३ कि.मी. चे रस्ते खोदून ठेवल्याने नागरिकांना खड्डयातून प्रवास करावा लागत असल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गॅस कंपनी व फायबर ऑप्टीकल कंपनीने गॅस पाईपलाईन व फायबर केबल टाकण्यासाठी खोदलेले रस्ते ३० मे पूर्वी बुजविण्याचा आयुक्त, महानगरपालिका यांनी अल्टीमेटम देऊन देखील खोदलेले रस्ते बुजविण्यात आले नसल्याने नागरिकांना जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खोदलेल्या रस्त्यावरुन प्रवास केल्याने शहरात अनेक ठिकाणी अपघात घडून येत असून अनेकांना मणक्यांच्या विकाराला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत एका राजकीय पक्षाच्या जिल्हाप्रमुखाने संबंधित ठेकेदारांवर गुन्हे दाखल करण्याची निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंपनीकडून खोदलेले रस्ते न बुजविल्याने कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२३) :** (१) राज्यातील शहरांमध्ये सेवा पुरवठा दृष्टीने शासनाच्या विविध निर्देशानुसार विविध सेवा प्रदाता कंपन्यांनी त्यांच्या सर्व्हिसेस टाकण्यासाठी खोदकाम केले आहे. ही बाब खरी आहे. तथापि खोदलेल्या ओघळया, मनपामार्फत तात्काळ दुरुस्त करण्यात आल्या आहेत व येत आहेत. त्यामुळे नागरिकांना खड्डयातुन प्रवास करावा लागत असल्याची बाब खरी नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. जिओ डिजीटल फायबर या कंपनीमार्फत रस्ता तोडुन, गॅस पाईप लाईन/ आ.एफ.सी टाकून, झाल्यावर नाशिक मनपामार्फत सदरचे रस्ते/ओघळया तात्काळ खडीकरण व काही ठिकाणी डांबरीकरण करून, दुरूस्त करण्यात आले आहेत, व काही ठिकाणी दुरुस्ती कामे प्रगतीत आहेत. त्यामुळे नागरीकांची गैरसोय होणार नाही अथवा अपघात होणार नाही, याची दक्षता घेऊन, नाशिक मनपामार्फत कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच पावसाळा ऋतु काळात आवश्यकते प्रमाणे संभाव्य ओघळया व रस्ते दुरुस्तीचे नियोजन करण्यात आलेले आहे.

---

## चेक बरांज (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) गावाचे पुनवर्सन करण्याबाबत

**(३९) ६९१५१ (२७-०९-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेक बरांज (ता.भ्रदावती,जि.चंद्रपूर) येथे सन २००८ मध्ये कर्नाटका एम्टा या कंपनीला कोळसा उत्खननाचे काम करण्यास शासनाने परवानगी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कंपनीच्या करारानुसार चेक बरांज येथील नागरिकांचे पुर्नवसन झाले नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चेक बरांज येथील नागरिकांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-११-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) जिल्हा पुनर्वसन प्रशासनातर्फे सन २०२०-२१ पासून, मौजा बरांज व मौजा चेक बरांज येथील पुनर्वसनास पात्र प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत संबंधितांबरोबर वारंवार सभा घेऊन पुनर्वसन करण्यास कंपनीला प्रवृत्त करण्यात येत आहे.

(३) पुनर्वसन कार्यवाहीअंतर्गत, दिनांक १९/६/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या पात्र पुनर्वसन धारकांकडून, "त्यांना पुनर्वसन हवे अथवा एकमुस्त रक्कम हवी" याबाबतची सहमतीपत्रे घेण्याची कार्यवाही दि.०३/०७/२०२३ पासून सुरु करण्यात आलेली असून, सहमती पत्रे जमा झाल्यानंतर, त्यानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्नाधीन कंपनीला सन २०१५ मध्ये कोळसा उत्खननाची परवानगी दिल्यानंतर, सन २०२० पर्यंत कंपनीचे कोळसा उत्खनन पूर्णत: बंद होते. त्यानंतर एम्टा आणि के.पी.सी.एल या दोन कंपन्यांच्या न्यायालयीन वादानंतर, नवीन माईन ऑपरेटर कंपनी म्हणून, बरांज कोल माईन्स प्रा.लि. यांना न्यायालयाने परवानगी दिल्यानंतर, जिल्हा प्रशासनास यासंदर्भात कार्यवाही करण्यास विलंब झालेला आहे, ही वस्तुस्थिती असून, सद्य:स्थितीत जिल्हा पुनर्वसन शाखेकडून यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

---

## मौजे जामसंडे-तुळशीकांटे (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील रहदारीचा रस्ता बंद असल्याबाबत

**(४०) ६९९८१ (०४-०९-२०२३). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जामसंडे-तुळशीकांटे (ता.देवगड, जि.सिंधुदूर्ग) येथील १६ फुट रुंद व १.५ कि.मी. लांब रस्ता तेथील स्थानिक रहिवाशांच्या गेली कित्येक वर्षे वहिवाटीत होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याच्या जमीनीचे मालक महमद शेरीफ अहमद खान यांनी तत्कालीन तहसीलदार व कार्यकारी दंडधिकारी, देवगड यांच्या कोर्टात तत्कालीन सरपंच श्रीमती रिद्धी रामदास भुजबळ यांच्या समक्ष दिनांक ३ मार्च, २०१४ रोजी रहिदारीचा रस्ता म्हणून ग्रामपंचायतीच्या ताब्यात दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ता जामसंडे नगरपंचायतीच्या हद्दीत येत असल्याने या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम नगरपंचायतीने सुरु केले असता, तेथील स्थानिक रहिवासी श्री.सखाराम कनेरकर व श्री.प्रदिप कनेरकर यांनी ६०० मीटर रस्त्याचे काम पुर्ण झाल्यानंतर मध्येच बंद पाडून तेथे चिऱ्याचे बांधकाम केल्याने स्थानिक रहिवाशांच्या रहदारीचा रस्ता सद्य:स्थितीत बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू रस्ता रहदारीकरिता बंद असल्याने तेथील स्थानिक रहिवाशांना त्यांच्या शेतात, बागेत, घरी जा-ये करणे शक्य होत नसल्याने रहिवाशांनी तहसिलदार व मुख्याधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२३) :** (१) अशा प्रकारची वहिवाट असल्याबाबतची नोंद नगरपंचायतीच्या दस्तावेजामध्ये उपलब्ध नाही.

(२) देवगड-जामसंडे नगरपंचायत हद्दीतील मौजे जामसंडे स.नं.४८६ हि.नं.७अ या सामाईक मालकीच्या जागेमधून सह हिस्सेदार जागामालक यांनी रस्ता बांधण्यासाठी जागा तत्कालिन जामसंडे ग्रामपंचायतीकडे संमतीपत्राने दिली आहे. तथापि, सदर रहिदारीचा रस्ता प्रत्यक्ष जागेवर रेखांकन करुन मोजणी नकाशा संबंधित जमीन मालक यांनी अदयाप नगरपंचायतीकडे सादर केलेला नाही.

(३) व (४) देवगड-जामसंडे नगरपंचायतीकडून सन २०२१ मध्ये तुळशीकांटे वसाहतीमधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण केल्यानंतर स्थानिक रहिवाश्यांनी चिरेबंदी कंपाऊंड बांधकाम करुन रहिवाश्यांचा रस्ता बंद केल्याची तक्रार नगरपंचायती कडे केली आहे.

(५) उक्त जागेची प्रत्यक्ष स्थळ पाहणी तसेच उपलब्ध दस्तावेज यांची पडताळणी, संमतीपत्रात नमूद करण्यात आलेल्या रस्त्याबाबतचा रेखांकन मोजणी केलेला भूमि अभिलेख नकाशा नगरपंचायतीकडे सादर करण्याबाबत तक्रारदारास कळविण्यात आले आहे. तक्रारदाराकडून सदरची माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील नियमोचित कार्यवाही नगरपंचायती कडून करण्याचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील कांचनगाव खंबाळपाड्यातील गुरुचरण जमिनीवर विकासकांनी व भूमाफियांनी बेकायदा इमारती उभारल्याबाबत**

**(४१) ६९३२१ (०४-०९-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील कांचनगाव खंबाळपाड्यातील गुरुचरण जमिनीवर विकासकांनी व भूमाफियांनी ७ मजल्याच्या बेकायदा इमारती उभारल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू खरेदीदारांची बनावट कागदपत्रांच्या आधारे सुमारे ३ कोटी रुपयांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-११-२०२३) :** (१), (२) व (३) सदर ठिकाणी एप्रिल २०२३ मध्ये बेकायदा इमारती निदर्शनास आलेल्या नाहीत.

तथापि, कांचनगाव, खंबाळपाडा या ठिकाणी दि.१७.०३.२०२० रोजी अनधिकृत बांधकाम निदर्शनास आले असून, सदर इमारतीवर दि.२५.११.२०२० रोजी अंशत: निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे.

सदर बांधकाम विकासक यांचेविरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३९७ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ नुसार टिळकनगर पोलीस स्टेशन डोंबिवली येथे FIR No. ०१३७, दि.०१.०९.२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच, सदर विकासक यांचेविरूध्द बनावट कागदपत्रे तयार केल्याप्रकरणी भारतीय दंड संहिता १८६० नुसार कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ नुसार FIR No. ०३७०, दि.०३.१०.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, विशेष पथकामार्फत चौकशी सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेला मिळण्याकरीता योजनांचे निकष, नियम व अटी शिथिल करण्याबाबत**

**(४२) ७०१२८ (३१-०८-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय योजनांचा लाभ थेट लाभार्थींपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्य शासन "शासन आपल्या दारी" अभियान राबवित आहे. याअंतर्गत आता संजय गाधी निराधार योजना, श्रावणबाळ निवृत्तीवेतन सेवा योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती योजना आदी योजनांच्या लाभापासून वंचित असणाऱ्या लाभार्थींचा प्रत्यक्ष वाडी-वस्तीवर जाऊन शोध घेऊन त्यांना या योजनांचा लाभ मिळवून दिला जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या संजय गांधी निराधार अनुदान योजना हजारो कुटूंबासाठी आधार ठरत आहे, मात्र या योजनेखाली पात्र होणाऱ्या कुटूंबात एक लाभार्थी असल्यास ६०० रुपये प्रतिमहिना, तर एका कुटूंबात एकापेक्षा जास्त लाभार्थी असल्यास १०० रुपये प्रतिमहिना आर्थिक सहाय्य दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी द्रारिद्रेषेखालील कुटूंबात यादीत नाव असणे तसेच २१ हजार रुपये वार्षिक उत्पन्न असणे आवश्यक आहे. तर प्रवर्गात कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न ५० हजारापर्यंत आवश्यक आहे. त्याचबरोबर श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेचा लाभ घेण्यासाठी ही लाभार्थी कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न २१ हजाराच्या आत असणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आताच्या काळात महिना १ हजार ७५० रुपयांमध्ये कुणाचाही उदरनिर्वाह होत नाही. त्यामुळे प्रत्येकाला आपल्या कुटूंबाचे पोट भरण्यासााठी यापेक्षाही अधिक पैसा कमवावाच लागतो, त्यामुळे या योजनांचे निकष, नियम व अटींची पूर्तता होत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रत्येक योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी कुटूंबासाठी काही निकष, नियम व अटी लागू केल्या असल्याने अनेक निराधार कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्यापासून वंचित राहत असून कल्याणकारी योजनांचे निकष, नियम व अटी शिथिल करण्यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजनांकरीता दिव्यांग लाभार्थी वगळता वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २१००० तर दिव्यांग लाभार्थ्यांकरीता वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ५०००० इतकी आहे.

(४), (५) व (६) संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजनांकरीता असलेले सध्याचे निकष व अटीनुसार राज्यात ४१ लक्ष इतके लाभार्थी आहेत. तसेच सदरहू योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात दरमहा रु.१००० वरुन रु.१५०० इतकी वाढ विभागाच्या दिनांक ०५.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

---

## नाजकधा अधिनियम १९७६ कलम २० अन्वये गृहबांधणी योजनेंतर्गत विविध गृहनिर्माण संस्थांना शासनाचे ना हरकत दाखला मिळण्याबाबत

**(४३) ७०२३० (३१-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई नागरी समुह, मुंबई, उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, उल्हासनगर नागरी संकुलन, ठाणे, उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समुह, पुणे, उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, नाशिक नागरी समुह, नाशिक व उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, नागपूर नागरी समूह, नागपूर या परिसरातील विविध गृहनिर्माण संस्थांनी नाजकधा अधिनियम १९७६ कलम २० अन्वये गृहबांधणी योजनेंतर्गत शासनाकडे ना हरकत दाखल्याची मागणी केलेली असून काही गृहनिर्माण संस्था ह्या मोडकळीस आलेल्या असून पावसाळयात कोसळण्याची शक्यता निर्माण झालेली असून सदर प्रकरण मा. मुख्यमंत्री यांच्या

कार्यालयात (नस्ती क्रमांक नाजक-२०२२/प्र.क्र. १६० / २०२२) माहे फेब्रुवारी, २०२३ पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

तथापि, उल्हासनगर नागरी समुहातील नाजकधा कलम २० च्या योजनेतील क्षेत्रावर स्थित गृहनिर्माण संस्थांना भोगवटा प्रमाणपत्र मिळणेसाठी व अभिहस्तांतरण (Conveyance Deed) करण्यासाठी येत असलेल्या अडचणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, उल्हासनगर नागरी समुह, ठाणे यांनी दि.६.१०.२०२२ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेला अहवालाच्या अनुषंगाने क्र. नाजक २०२२/प्र.क्र.१६०/ नाजकधा या नस्तीमधून सादर केलेल्या प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त झाली आहे.
(२) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ मधील कलम २० अन्वये मंजुर योजनेअंतर्गत पूर्ण झालेल्या इमारतींना अभिहस्तांतरणासाठी ना-हरकत देण्याबाबत शासन पत्र दि.११.६.२०१९ नुसार सर्वसाधारण सुचना देण्यात आल्या आहेत. तथापि, अशा प्रकरणांमध्ये मानीव अभिहस्तांतरण प्रक्रियेत नाजकधा अंतर्गत ना-हरकत दाखला मिळण्याच्या अनुषंगाने होणारा विलंब व अडचणी विचारात घेता, नाजकधा कलम २० अन्वये मंजूर योजनेंतर्गत इमारतींना, सक्षम प्राधिकारी कार्यालयाकडून यापूर्वीच "भोगवटा प्रमाणपत्रासाठी" ना-हरकत देण्यात आली असेल तर, अशा संबंधित नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांना अभिहस्तांतरणासाठी सक्षम प्राधिकारी, नाजकधा कार्यालयाची पुन्हा ना-हरकत घेण्याची आवश्यकता नसल्याबाबत शासन पत्र दि.२५.०३.२०२३ अन्वये कळविण्यात आले आहे.

आता, नाजकधा कलम २० अन्वये मंजूर योजनेंतर्गत इमारतींना सक्षम प्राधिकारी कार्यालयाकडून यापूर्वी "भोगवटा प्रमाणपत्रासाठी" ना-हरकत देण्यात आली नसेल तर, अशा संबंधित नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांना शासन पत्र दि.१८.०७.२०२३ मधील अटी व शर्तीनुसार अभिहस्तांतरणासाठी ना-हरकत देण्याबाबत सर्व नागरी समुहांच्या जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा विभागातील कंत्राटी चालक-वाहकांना रा.प. महामंडळाच्या नियमित सेवेत सामावून घेणेबाबत

**(४४) ७०२६२ (३१-०८-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहे ऑक्टोबर, २०२२ पासून व नंतरच्या काळात जवळजवळ ६ महिन्यांपर्यंत चाललेल्या रा.प. महामंडळ कर्मचाऱ्यांच्या संपामुळे राज्यातील परिवहन सेवा पूर्णपणे विस्कळीत झालेली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा संघर्षमय काळात बुलढाणा विभागातील १२० कंत्राटी चालक वाहकासहीत राज्यभरातील ८०० कंत्राटी चालक-वाहकांनी सदर परिवहन सेवा सुरु ठेवून रा.प. महामंडळास जीवनदान दिले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ३ सप्टेंबर, २०२२ रोजी वाहतूक विभागाने सर्व कंत्राटी चालक-वाहकांचा वापर पूर्णपणे बंद करण्याचा शासन आदेश काढल्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांवर बेकार राहण्याची परिस्थिती ओढवली असल्याने बुलढाणा विभागातील कंत्राटी चालक वाहकांना रा.प. महामंडळाच्या नियमित सेवेत सामावून घेणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २३ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२३) :** (१), (२) होय.

दि.२७.१०.२०२१ पासून रा.प.कर्मचा-यांनी पुकारलेल्या बेमुदत संपामुळे प्रवाशांची / विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून आपत्कालीन परिस्थितीमध्ये बाहयसंस्थेद्वारे बुलढाणा विभागामध्ये ४३ व राज्यभरामध्ये १०९३ कंत्राटी चालक एक महिन्यासाठी पुरविण्यात आले होते. व त्यास वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली होती. सदर कंत्राटी चालकांमार्फत काही प्रमाणात वाहतूक सुरु होती.

(३) होय.

(४) व (५) मा.उच्च न्यायाल्याने दिलेल्या आदेशान्वये, दि.२२.०४.२२ पर्यत सर्व रा.प.कर्मचारी कर्तव्यावर रुजू झाल्याने बाहयसंस्थेद्वारे नियुक्त चालकांची आवश्यकता उरली नसल्यामुळे दि.०३.०९.२०२२ पासून त्यांना टप्प्या टप्प्याने कमी करण्यात आले.

---

## मावळ, भोसरी (ता.खेड, जि.पुणे) येथील चाकण औद्योगिक वसाहतीमधील जिर्ण झालेल्या वाहिन्या दुरुस्ती करण्याबाबत

**(४५) ७०३०० (१२-०९-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील चाकण औद्योगिक वसाहत मावळ, भोसरी येथील अनेक वर्षापूर्वी टाकलेल्या मैलापाणी वाहिन्या जीर्ण झाल्या असून, पाणीपुरवठ्याच्या वाहिन्यांमध्ये मैलापाणी मिसळत असल्याने या परिसरातील नागरिकांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या वेगवेगळ्या विभागांकडून येथील मलवाहिनी दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने या भागातील जीर्ण वाहिन्या बदलण्यासाठी व कामांमध्ये दिरंगाई करणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) पूर्ण औद्योगिक क्षेत्रामध्ये सांडपाणी वाहीन्या टाकण्यासाठी मोठया भांडवली खर्चाची आवश्यकता असून सदरचे काम मनपा मार्फत करणे सद्यस्थितीत शक्य नसून यासाठी उद्योग विभागाकडून आर्थिक मदत उपलब्ध झाल्यास सदरचे काम करणे शक्य असल्याचे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुळगाव बदलापूर नगरपरिषद (जि.ठाणे) हद्दीतील रस्त्यांची झालेली दूरवस्था

**(४६) ७०४०१ (३१-०८-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव बदलापूर नगरपरिषद (जि.ठाणे) हद्दीत रिलायन्स गॅस पाईप लाईन, सांडपाणी प्रकल्प, महावितरण कंपनी, पाणीपुरवठा योजना व इतर योजनांच्या ठेकेदारांनी कॉन्क्रीटीचे सुस्थितीत असलेले रस्ते खोदून संपूर्ण शहरातील रस्त्यांची खोदकाम करून चाळण केल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले व त्यानुषंगाने रस्त्यांचे खोदकाम करून संपूर्ण शहरात खड्डे करणाऱ्या संबंधित विभागाच्या ठेकेदार, अधिकारी तसेच त्यांच्याकडून आर्थिक गैरव्यवहार करून परवानगी देणाऱ्या व रस्ते पूर्ववत चांगले करून न घेणाऱ्या नगरपालिकेच्या मुख्याधिकारी व शहर अभियंता यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२३) :** (१) कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये ऑप्टीकल फायबर केबल टाकण्याकरीता (महानेट) रस्ता खोदाईसाठी शासन निर्णय दि.२८/०९/२०१८ अन्वये रिलायन्स कंपनी, महानगर गॅस व इतर योजनेसाठी कॉक्रिट रस्त्याच्या बाजूला असलेल्या उपयोगित सेवा(Utility Service) करीता सोडलेली साईडपट्टी खोदण्यासाठी नगरपरिषद रस्ता खोदाई शुल्क भरुन परवानगी देते. तथापि, मुख्य कॉंक्रिट रस्ता खोदाईसाठी नगरपरिषदेने अदयाप परवानगी दिलेली नाही.
(२) व (३)नगरपरिषदेने शहरातील कॉक्रिट रस्ते करण्याच्या वेळेस रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी उपयोगित सेवा (Utility Service) साठी सोडलेल्या जागेवर पेव्हर ब्लॉक लावण्यात आले असून त्यामधून ऑप्टीकल फायबर केबल, गॅस पाईप लाईन, विद्युत केबल, पाणी पुरवठा पाईपलाईन इत्यादी कामांसाठी रस्ता खोदाईची परवानगी देण्यात येते.
कॉंक्रिट रस्त्याच्या उपयोगित सेवा (Utility Service) जागेमध्ये पडलेले खड्डे बुजविण्याकरीता खडी, कपची टाकण्यात येते. आवश्यकतेप्रमाणे डांबरीकरण / कॉक्रिटीकरण किंवा पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी निविदा प्रक्रिया करुन कंत्राटदाराची नेमणूक नगरपरिषदेने केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राहुरी (जि.अहमदनगर) तहसिल कार्यालयाकडे संजय गांधी निराधार अनुदान लाभार्थ्यांची प्रकरणे प्रलंबित राहिल्याबाबत

**(४७) ७०७४४ (३१-०८-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संजय गांधी निराधार अनुदान योजनेची समिती अस्तित्वात नसल्यास, संबंधीत तहसिलदार यांनी प्रत्येक महिन्यात एकदा संजय गांधी निराधार अनुदान योजनेची बैठक आयोजित करणे शासन निर्णयानुसार बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या चार महिन्यांपासून तहसिलदार, राहुरी यांनी संजय गांधी निराधार अनुदान योजनेची बैठकच आयोजित केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त नमूद समितीची बैठकच होत नसल्याने विधवा,अपंग,वृध्द लाभार्थ्यांचे प्रकरणे प्रलंबीत राहिल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होत असून ही प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) तसेच सदर समितीची बैठक आयोजित करण्यास विलंब करणारे तहसिलदार , राहुरी यांच्यावर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत.

**श्री. एकनाथ शिंदे (०६-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी येथे विशेष सहाय्य योजनेबाबत प्राप्त झालेल्या अर्जांच्या संदर्भात संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या दिनांक १७/०२/२०२३, १९/०६/२०२३, २०/०७/२०२३ व २१/०९/२०२३ रोजी बैठका घेण्यात आल्या आहेत. सदर बैठकीत एकुण ८५५ प्राप्त झालेल्या अर्जापैकी ७४१ अर्ज मंजूर, १०० अर्ज नामंजूर व १४ अर्ज त्रुटी पुर्ततेसाठी प्रलंबित आहेत.

---

### भुसावळ नगरपालिकेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(४८) ७१४९६ (०४-०९-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसाळच्या नगरपरिषदेच्या विविध भ्रष्टाचार संबंधी शासनाकडे तक्रार केल्यानंतर शासनाने एक त्रिस्तरीय समिती बनवून त्याद्वारे चौकशी करण्याचे आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने आपला अहवाल माहे मार्च, २०२३ मध्ये जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीने आपला अहवाल तात्काळ दिल्यामुळे जिल्हाधिकारी यांच्याकडे दिल्यानंतर, ई-मेलद्वारे तक्रारदाराने जिल्हाधिकारी जळगाव यांना याबाबत माहे एप्रिल २०२३ मध्ये या संपुर्ण प्रकरणाची तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी कोणतीही कारवाई माहे जुलै, २०२३ पर्यंत केले नसल्यामुळे शासनाच्या आपले सरकार पोर्टलवर यु आर डी एम / २०२३ /१९४३९ दिनांक १६ जुलै, २०२३ रोजी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन जिल्हाधिकारी जळगाव व संबंधित अधिकारी यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१), (२) व (३) अंशतः हे खरे आहे,

सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दि.२३.०३.२०२२ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा प्रशासन अधिकारी, जळगाव यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली.

(४) हे खरे आहे,

सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या कार्यालयाकडून योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे.

(५) सदर प्रकरणी चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे. यानुसार, भुसावळ नगरपालिका अंतर्गत सुरु असलेल्या विविध विकास कामांबाबत नगरपरिषद स्तरावर उपलब्ध असलेल्या अभिलेखाची तपासणी, तसेच निवडक कामांची समितीमार्फत प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता, सदरची कामे योग्य असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्रभारी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण तथा समाज कल्याण अधिकारी यांनी प्रशासकीय अनियमिततेतून केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(४९) ७१४९८ (१२-०९-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील प्रभारी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण तथा समाज कल्याण अधिकारी श्री.रविंद्र शिंदे हे वारंवार अतिरिक्त कार्यभार व नियमित कार्यभार बीड जिल्ह्यामध्ये घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मातोश्री सेवाभावी संस्था वडझरी (ता.पाटोदा जि.बीड) अंतर्गत आश्रमशाळेतील बडतर्फ व गैरहजर असलेल्या शिक्षकांचा सन २०२१-२०२२ व त्यानंतरही सदरील अधिकारी यांनी मुख्याध्यापकाचा डीडीओ कोड बदलून स्वत:च्या अधिकारात नसतांना कोट्यावधी रुपयांचे वेतन कार्यभार असताना व नसताना काढलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद व प्रभारी सहाय्यक आयुक्त या दोन्ही पदावर आर्थिक बाबीच्या अधीन राहून कार्यरत आहे. तसेच गेल्या काही दिवसापूर्वी एका खोट्या संस्थेच्या माध्यमातून दिलेल्या समाज कल्याण विभागाच्या जाहिरातीमुळे व त्यातील अनियमिततेमुळे त्यांचे निलंबन देखील झालेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, निलंबन झालेल्या संचिकेची चौकशी तसेच निधीचा झालेला अपहार या बाबतीत देखिल पुन:श्च एकदा चौकशी होवून कार्यवाहीची मागणी पत्राद्वारे मा.स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेली आहे. हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सत्वर चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बीड या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकाऱ्यांना सोपवूनही त्यांनी सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार स्विकारला नसल्यामुळे प्रशासकीय कारणास्तव श्री.रविंद्र शिंदे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.
(२) अंशत: खरे आहे.

मातोश्री सेवाभावी संस्था वडझरी, ता.पाटोदा, जि.बीड संचलित प्राथमिक आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना पुनर्स्थापित करण्यात आले. परंतु, सदर कर्मचाऱ्यांचे वेतनाचे प्रस्ताव सदर आश्रमशाळेचे मुख्याध्यापक हे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बीड यांच्याकडे सादर करत नव्हते. त्यामुळे कर्मचारी वेतनापासून वंचित राहत होते. सदर कर्मचारी वेतनापासून वंचित राहू नये म्हणून, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बीड यांनी शासन मान्यतेने डीडीओ कोडचा पासवर्ड बदल करुन, सदर कर्मचाऱ्यांचे हजेरी पत्रक तपासून वेतन अदा केले आहे.
(३) हे खरे आहे.

गुरुकिल्ली ॲकॅडमी, बीड या संस्थेस स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यास अनियमितरित्या परवानगी दिल्याप्रकरणी श्री.आर.एम.शिंदे यांचेविरुध्द दि.१३.०३.२०१९ च्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली असून, दि.१७.०३.२०२० च्या आदेशान्वये चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचेकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) व (५) हे खरे आहे.

श्री.आर.एम.शिंदे, प्रभारी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बीड यांचे विरुध्द निधी वितरणामधील अनियमिततेबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या दि.२७.०९.२०२३ रोजीच्या आदेशान्वये अतिरिक्त आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती पुर्नगठीत करण्यात आली आहे. समितीचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड नगरपरिषद अंतर्गत शासकीय जागेवरील अतिक्रमणे शासन नियमाप्रमाणे नियमित करण्याबाबत**

**(५०) ७१५२३ (०४-०९-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड नगरपरिषद अंतर्गत पुरग्रस्त कॉलनी, प्रकाश आंबेडकर नगर, रामतिर्थ एमआयडीसी, इंदिरानगर, भीमनगर जुना मोंढा व वाढीव हद्दीतील नागरिकांना शासनाच्या वतीने किमान ९०० ते ९५० घरकुले आजमित्तीला मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील लाभधारक शासकीय जमिनीवर राहत असल्याने व त्यातीलच काही लाभधारकांना विभागाच्यावतीने घरकुल मंजुरीसह बांधकाम झाले असल्याने उर्वरीत नागरिकांना या विषयी लाभ घेणेसाठी वारंवार नियमोचीत अडचणीचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नगरपरिषद, बीड व लोकप्रतिनिधी यांनी वरिष्ठ कार्यालयाकडे याविषयी रितसर पत्र व्यवहार केला असून आजतागायत कायमस्वरूपी सदर प्रकरणी कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी सत्वर कार्यवाही झाल्यास नागरिकांना व लाभधारकांना याविषयी नियमोचीत सहकार्य होईल, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-११-२०२३) :** (१), (२), (३) व (४) "सर्वांसाठी घरे-२०२२" या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बीड नगरपरिषद क्षेत्रातील पुरग्रस्त कॉलनी, प्रकाश आंबेडकर नगर, रामतिर्थ एम.आय.डी.सी., इंदिरानगर, भीमनगर व जुना मोंढा या भागातील नागरिकांचा बीड नगरपरिषदेमार्फत दि.१० नोव्हेंबर, २०२१ रोजी सर्वे करण्यात आला आहे. सदर भागातील एकूण ८५७ अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय, बीड यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**नागपूर.** **सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.